मेरु पर्वताच्या पल्याड

टेरवांक १ कोण हा मनास?



# मेरु पर्वताच्या पल्याड

हिमशिखरामागून सूर्य डोकावला आणि त्याचे किरण पडले एका थंडीने रापलेल्या, वाऱ्याने रुक्षलेल्या आणि तरीही उत्साही दिसणाऱ्या चेहऱ्यावर. मी तंबूची झडप उघडली व सूर्याची आणि माझी अशी भेट झाली. त्याचे सोनेरी, उबदार किरण कितीतरी दिवसांनी मी पहात होतो. गेला आठवडाभर वादळाचा, पावसाचा आणि गारांचा धुमाकूळ चालू होता. परवा पावसातच आम्ही तंबू उभारले होते. काल संध्याकाळी थकून मी तंबूत शिरलो, तर पाऊस पडत होता. थंडीचा कडाका वाढत चालल्याची जाणीव होत होती. अनातोलीकडून मी आणखी एक स्वेटर मागून आणले, आणि त्याच्या उबेत शिरलो. झोप गाढ लागली. पण सकाळी उठून पाहतो तर निरभ्र आकाश आणि स्वच्छ सूर्यप्रकाश! तंबूच्या सभोवती नजर टाकली तर मऊ हिमाने सारे शुभ्र झालेले. हिरव्या गवतावर हिमाचा शुभ्र गालिचा अंथरलेला आणि तंबूच्या उतरत्या बाजू हिमाने जड झालेल्या. गेल्या आठवड्यातील वादळी हवेची ही परिणती होती.

पलीकडच्या तंबूतून अजून कोणीच — योसा, अनातोली, ~~[illegible]~~ अकसा — कोणीच बाहेर पडलं नव्हतं. काल अगदी अंधार पडेपर्यंत आम्ही भटकत होतो. त्या विस्तीर्ण कुरणांमध्ये आम्हाला मोठे सँडस्टोन आणून रचलेली वर्तुळे सापडली होती. कोणी आणले हे पाषाण इथे? त्या मैदानी, कुरणांच्या प्रदेशात तर औषधालाही दगड नव्हता. साऱ्या गारगोट्या आणि वाळू, प्रवाहांच्या पात्रांत किंवा त्यांच्या जवळपास पसरलेली. भोवती मैलोन्‌मैल पसरलेली गवताळ मैदाने. दूरवर क्षितिजाशी टिएनशान पर्वताच्या रांगा. त्यांचे माथे बर्फाच्छादित. उंची असावी ४००० ते ५००० मीटर म्हणजे १२ ते १६ हजार फूट. ज्यांनी हे पाषाण इथे आणले, त्यांनी ते दूरचे पर्वत खोदूनच आणले असणार. कशासाठी?

आणि असे वर्तुळाकार रचण्यात कोणता हेतू होता त्यांचा? मला डॉ. कोसांबींनी पुण्याजवळ केलेले संशोधन आठवले. पुण्याच्या पूर्वेला काही ठिकाणी त्यांना अशीच पाषाण-वर्तुळे मिळाली होती. महाराष्ट्रात अतिप्राचीन काळी ज्यांनी वस्ती केली, अशा मानवी टोळ्यांनी ती उभारली असावीत. त्यांच्या संस्कृतीचं तेवढंच प्रतीक आता शिल्लक उरलं होतं.

पण आता तर मी पुण्याहून कितीतरी दूर होतो. हिमालयाच्या पलीकडे, ४० उत्तर अक्षांशावर मध्य आशियाच्या प्रसिद्ध, मैदानी, गवताळ - स्टेप प्रदेशात - मी येऊन पोहोचलो होतो; आणि इथून पुण्यातल्या सांस्कृतिक अवशेषांशी धागा जुळविण्याचा प्रयत्न करीत होतो. ही पाषाण-वर्तुळं कसली असा प्रश्न सोसा, अनातोली आणि मला पडला तरी आवन्सा त्याबाबत निःशंक होता. आवन्सा हा जातिवंत किरगीज. त्याच्या देशात - किरगीजिस्तानात - अशा अद्भुत गोष्टी करून दाखविणारी एकच व्यक्ती होती. मनास हा त्यांचा महान योद्धा. आपले कृष्ण, अर्जुन, भीम किंवा विक्रमादित्य, समुद्रगुप्त यांचे मिश्रण म्हणजे हा मनास. किरगीज लोकांनी या योद्ध्याभोवती असंख्य आख्यायिका, काव्ये, महाकाव्ये आणि गोष्टी रचल्या आहेत. त्याच्यावरच्या महाकाव्याची लांबी महाभारताच्या अडीचपट आहे, असं किरगिजिस्तानात मिळणाऱ्या मार्गदर्शिकेत अभिमानाने लिहिलेलं मला आठवलं. मध्य आशियात मनास किंवा मानस या प्रकार व्यक्तिमत्वाचा जनमानसावर एवढा पगडा आहे की युनेस्कोने १९९५ हे वर्ष मनासचं वर्ष म्हणून साजरं केलं!

कोण असावा हा मनास किंवा मानस? त्याचं नाव तर मला इतकं अस्सल भारतीय वाटलं

की माझं मन एकदम गतकाळात शिरलं. किरगिझीस्तान-
-ला काही लेखकांनी "क्रेडल ऑफ दी अर्थ" असं म्हटलं
आहे. मध्य आशियातल्या या गवताळ, मैदानी प्रदेशात
जन्मलेल्या आणि तेथून मुलुखगिरी करायला बाहेर
पडलेल्या योद्ध्यांनी जुन्या जगाला नेहमीच हादरवून
सोडलेलं आहे. कित्येक विद्वानांचे मत असे आहे की वेद
ज्या आर्यांनी लिहिले, त्यांचे पूर्वज याच प्रदेशात रहात
असावेत. पामीरच्या पठारापासून पूर्वेकडे, मंगोलियाच्या
सरहद्दीवरील अल्ताई पर्वताच्या उतारावरील भाग, या
प्रदेशांत फार प्राचीन काळी हे लोक रहात असावेत. म्हणजे
मी आता पहात असलेल्या टिएनशान पर्वताच्या रांगांनीच
या, आपल्या सर्वांच्या दूरच्या पूर्वजांवर, निसर्गाचे संस्कार
घडविले असावेत.

मनास हा त्या काळातील तर नसेल? प्रचंड वेगात
धावणाऱ्या घोड्यावर बसलेला, शिरस्त्राण आणि चिलखत-
-त घातलेला, हातात लांब भाला धरलेला मनास किंवा
मानस या योद्ध्याची प्रतिमा मी किरगिझीस्तानात सर्वत्र
पहात होतो. घोडा, माणसाळलेला घोडा, हा इथल्याच
लोकांनी तत्कालिन सुधारलेल्या जगाला म्हणजे पश्चिम
आशिया, बॅबिलोनिया, ईजिप्त यांना भेट करुन दिला.
पण ही घटनाही नंतरची असावी. या प्रदेशातल्या वन्य
गाढवाशी कदाचित त्यांचा परिचय घोड्याच्याही आधी
झाला असावा. वन्य गाढवाला पाळण्यात ते यशस्वी
झाले असावेत. ऋग्वेदातही रथाला जोडलेल्या गाढ-
-वाचा उल्लेख आढळतो (मंडल १ - सूक्त १६२ - ऋचा २१).
त्यानंतर घोडा माणसाळला असावा आणि तो रथाला
जोडला गेला. आणि त्याही नंतर घोड्यावर बसण्याचे
कौशल्य माणसाने आत्मसात केले. मनास हे त्या
काळाचे प्रतीक तर नसेल?

माझ्या सभोवती, क्षितिजापर्यंत पसरलेल्या, त्या

समतोल मैदानांकडे पाहताना माझे मन भूतकाळाचा वेध घेत होते. फार प्राचीन काळी सरसकट भागात, नद्यांच्या काठी घनदाट अरण्ये असणार. या अरण्यांना आणि त्यातल्या वन्य श्वापदांना भिऊन माणूस कदाचित या अधिक उंचीवरच्या प्रदेशात येऊन राहिला असावा. इथे, या उंच प्रदेशात उन्हाळा असा नव्हताच. त्यामुळे त्याला हिवाळा आणि वसंत ऋतू एवढेच माहीत होते. डोंगरातील गुहा आणि मैदानात प्राण्यांनी केलेली बिळे मोठी करून त्यामध्ये तो राहात असावा. हळूहळू त्याने या कुरणातील प्राण्यांशी जमवून घेतले. त्यांना पाळून त्यांच्याबरोबर भटके जीवन तो जगू लागला. जनावरांची कातडी हाच त्याचा वेष होता. शिकार करून मांस भाजणे आणि त्याला खडकातील मिठाने (सैन्धव) चव आणणे, हे इथल्याच निसर्गातून तो शिकला असावा. तांबडे हरीण आणि लांडगा हे त्याच्या जास्त परिचयाचे प्राणी. पहिला, आवडती शिकार म्हणून आणि दुसरा, पाळीव मेंढ्यांवर झडप घालणारा शत्रू म्हणून. वेदपूर्व काळातील या परिचित प्राण्यांचे उल्लेख म्हणूनच ऋग्वेदातही खूप सापडतात. त्याच्या पाळीव जना-
इथे वरांच्या कळपाभोवती फिरणारे, उडणारे श्येन (ससाणा) आणि गृध्र (गिधाड) हे त्याचे परिचित पक्षी. त्यांनाही ओळखत तो वेदकाळात विसरला नाही. तो ज्या सरोवरा-भोवती राहात होता, त्यावर पोहत होते चक्रवाक आणि हंस. ते पुढेही त्याच्या काव्याचे विषय होऊन राहिले. एक प्रियेच्या विरहाने झुरणारा तर दुसरा विरहिणींच्या दूताचे काम करून प्रेमी जनांची भेट घडवून आणणारा! [illegible]च्या विश्वात रमलेली माझ्या विचारांची साखळी हंसापर्यंत आली आणि एकदम थबकली. हंसाला - राजहंसाला शोधायला-पहायला तर मी इथे आलो होतो.

मी भानावर येऊन तंबूपलीकडे नजर टाकली. घोड्यांच्या टापांचा धीमा आवाज कानांवर आला. मनाशी

भूतकाळाकडे झुकून पाहणाऱ्या मनाला आवर घालीत मी उठून बसलो आणि तंबूची झडप पूर्ण उघडली. अकसा-अतालोकीच्या तंबूबाहेर खरोखरच एक घोडे-स्वार उभा होता. त्याने लोकरीचा पायघोळ अंगरखा चढविला होता, पण चिलखत नव्हते! मात्र शिरस्त्राणा-सारखीच कान झाकणारी, मोठी टोपी त्याच्या डोक्यावर होती आणि कमरेला तलवार लटकत होती! त्याच्या हातात लांबसा चाबूक होता आणि घोड्याबरोबर त्याला कुत्राही होता. मेंढ्या आणि घोडे पाळणाऱ्या किरघीज टोळीवाल्यांना अस्सल नमुना मी पहात होतो.

त्याला पाहून अकसा तंबूतून बाहेर आला आणि त्याच्याशी बोलू लागला. ते काय बोलत होते, हे मला फारसे ऐकू येत नव्हते, की समजतही नव्हते. पण सकाळच्या फटकतीत पश्चिमेकडे, नजीकच आम्हाला घोड्यांचे कळप दिसले होते. त्या बाजूकडून हा घोडेस्वार आला असावा, असा मी अंदाज केला. घोडे पाळणाऱ्या लोकांचे तंबू आम्हाला दिसले नव्हते. ते नजीकच नसून दूर डोंगरांत असावे असं आम्हाला वाटलं होतं. आता हे लोक कोणते, हे प्रथम मला सांगितले पाहिजे. या नजीकच्या गेले सात दिवस आम्ही छावणी करून रहात होतो. किरगिझीस्तानचा नकाशा तुम्ही पाहिला आहे का? हिमालयाच्या प्रमुख रांगांच्या वायव्येला नजर टाकीत उत्तर अक्षांश ओलांडा. आपल्या लडाखच्या उत्तरेला नजर टाकलीत तर पूर्वेला कुनलुन पर्वताच्या रांगा दिसतील आणि पश्चिमेला दिसेल काराकोरम. कुनलुन पर्वतांचं वेदातलं नाव आहे हेमकूट. नजर आणखी उत्तरेकडे वळविलीत तर पूर्वेकडे लागेल चीन-मधले तारीम खोरे आणि त्यातले टाकलामकान वाळवंट. पश्चिमेकडे लागेल पामीरचे पठार आणि ताजिकिस्तान. पूर्वी जगाचा माथा म्हणून पामीरचे पठार प्रसिद्ध होते.

आर्यांना मेरु पर्वत हाच असावा, असं काही विद्वा-
-नांचं म्हणणं आहे. ताजिक लोक हे मूळ आर्यांचे
वंशज समजले जातात आणि त्यांची भाषा, त्यांच्या चालि-
-रीती यांवर अजूनही त्या काळाची छाप आढळून येते.
इथून पुढे उत्तरेला आपण येतो टिएनशान पर्वताच्या
रांगांत आणि इथेच किरगिझीस्तानची हद्द सुरु होते.
वेदात टिएनशान पर्वताचा उल्लेख निषध या नावाने
केलेला आहे.

३९° ३०" उत्तर अक्षांशावर असलेले किरगिझी-
-स्तान हे पूर्वीच्या सोविएट युनिअनमधले एक राज्य.
सोविएट युनिअनची शकले झाल्यावर आता स्वतंत्र राष्ट्र
म्हणून घोषित झालेले. जगाच्या ॲटलासमध्ये किरगिझी-
-स्तानचा नकाशा शोधून पाहिलात तर त्या नकाशातले
तीन मोठी सरोवरे चटकन नजरेत भरतील. त्यातले
दक्षिणेकडचे आहे चीनच्या सरहद्दीला लागून आणि
ईशान्येकडचे आहे, कझाकस्तानच्या सरहद्दीजवळ.
तिसरे आहे किरगिझीस्तानच्या मध्य भागात. त्याचे नाव
आहे सोंग-कुल. दक्षिणेकडचे छातर-कुल आणि
ईशान्येकडचे इसिक-कुल. कुल म्हणजे सरोवर. ही
तिन्ही सरोवरे टिएनशानच्या रांगांनी वेढलेली आहेत.
सारा किरगिझीस्तान टिएनशान पर्वताने व्यापलेला
आहे. इसिक-कुल आहे २००० मीटर उंचीवर (६०००-
६५०० फूट) तर सोंग-कुल व छातर-कुल ही सरो-
-वरे आहेत ३१००-३२०० मीटर उंचीवर (११०००-१२
००० फूट).

किरगिझीस्तानच्या मध्यभागात असलेल्या सोंग-
कुल सरोवराकाठील आमची छावणी होती. अकरा
हजार फूट उंचीवरच्या या पठारावर पसरलेल्या
"अल्पाईन" कुरणांमधून आणि त्यांच्या मध्यभागी
असलेल्या सरोवरातून गेले सात दिवस आम्ही

फिरत होतो.

दिल्लीहून विमानाने मी ताश्कंदला आलो. विमानातून उतरताना सहज अवतीभवती नजर टाकली तर चकित होण्याची पाळी आली. विमानतळावरील गवतात आपली साळुंकी – भारतीय मैना – यांचा छोटासा थवा बिनदिक्कतपणे फिरत होता. नेहमीच्या सराईतपणे, सहजतेने, बेगुमानपणेही ती आपल्याकडल्या शेतांत, माळरानात फिरेल, त्याच थाटात त्या तिथे वावरत होत्या! हिमालय ओलांडून आली असेल हा पक्षी! हिमालयाच्या अंतर्भागात, काश्मीरच्या खो-यातही त्याला कधी पाहिलेले मला आठवत नव्हते. मग रेल्वेवर, बोलन खिंडीतून इतर प्रवाशांच्या मागे मागे राहून त्याने हिमालय पार केला असेल का? काहीही असो. मध्य आशियात सहजपणे प्रवेश केलेल्या या भारतीय पक्ष्याचे मला कौतुक वाटले खरे. इथल्या कडक हिवाळ्यालाही तो सरावलेली आहे. हिवाळ्यात तो स्थलांतर करीत नाही, हे जेव्हा कळले, तेव्हा आश्चर्यही वाटले. माणसाच्या सान्निध्य राहणार पक्षी, माणसासारखेच अनेक गोष्टी पटकन शिकतात, असं दिसतं!

ताश्कंदहून मी आल्मा-आटा (किंवा आल्माटी) इथे उतरलो. ही कझाकस्तानची पूर्वीची राजधानी. अलिकडे राजधानी इथून हलविली गेली आहे. कझाकस्तानचे हे प्रमुख शहर. इथून किरगिजीस्तानची सरहद्द दूर नाही. कझाकस्तानही पूर्वीच्या सोविएट युनियनमधले राज्य. आता कझाकस्तान व किरगिजीस्तान हे स्वतंत्र देश झाले असले तरी त्यांच्यात खुले दळणवळण चालते. माझ्याजवळ कझाकस्तानचा व्हिसा नव्हता, किरगिजीस्तानचा होता. पण कझाकस्तानात प्रवेश करण्यास मला अडचण आली नाही. माझा डच मित्र योस्त याने मला तिथे उतरवून

येण्याची व्यवस्था केली होती.

गेली सहा वर्षे योसा मॉस्कोमध्ये होता. तिथून त्याने कझाकस्तान-किरगिझीस्तानच्या अनेक वाऱ्या केल्या. स्वतःच्या लँडरोव्हरमधून प्रवास करीत अनेक दऱ्या-पर्वत पालथे घातले. या देशांतल्या पक्ष्यांचा अभ्यास केला. त्यासाठी रशियन भाषा शिकून घेतली, आणि इथल्या लोकांमध्ये घरच्यासारखा मिसळून गेला. तो भारतात आला होता, तेव्हा जलाशय, सरोवरे पहात आम्ही असेच भटकलो होतो. राजहंसांबाबत मला कुतूहल आहे, त्यांचा अभ्यास मी करीत आहे, हे योसाला माहीत होते. राजहंसपक्षी हिवाळ्यात भारतात येतात पण वसंतऋतूत तिबेटपासून उत्तरेकडे पार बैकल सरोवरापर्यंतच्या प्रदेशात घरटीं बांधण्यासाठी परत जातात. तिबेट, मंगोलिया, सोव्हिएत युनियनमधील मध्य आशिया, या प्रदेशांत ते घरटीं बांधतात, हे मला माहीत होते. भारतीय हद्दीतली त्यांची सर्वात मोठी वसाहत, लडाखमध्ये मी १९८० साली शोधून काढली होती. पण त्याही पलिकडच्या, मध्य आशियातल्या त्यांच्या वसाहती मी पाहिल्या नव्हत्या. योसाला जेव्हा किरगिझीस्तानात सोंग-कुल इथे राजहंस दिसले, तेव्हा त्याने मला लगेच कळविले. आणि आमची किरगिझीस्तान भेटीची आखणी केली.

१९९८ च्या जून महिन्यात मी बिश्केक या किरगिझीस्तानच्या राजधानीत येऊन थडकलो. मध्यरात्र उलटून गेली होती, रिमझिम पाऊस पडत होता. आणि तपमान शून्याच्या आसपास होते!

मी जेव्हा एखाद्या नवीन मुक्कामात जातो, तेव्हा पहिल्या सकाळची तेथली उत्सुकतेने वाट पाहतो. ती जर लावण्यवती असेल तर तिथल्या शहर-माणसांना, डोंगर-दऱ्यांना भेटायला मन आतुर होतं; ती जर आळसावलेली, उदासवाणी असेल तर मळभल-ल्या शंकांनी मन व्याकूळ होतं आणि वाटतं की या प्रवासात एकही गोष्ट गोड होणार नाही!

काल रात्री मी ताश्कंदला पोहोचलो, तेव्हा वातावरण उदासवाणं होतं. पाऊस रिपरिपत होता, रस्त्यातल्या खड्ड्यांतून पाणी साचलं होतं, कडेच्या दिव्यांचा प्रकाश म्लान होता, आणि हॉटेलची इमारत एखाद्या मोठ्या तुरुंगासारखी भासत होती. मला मिळालेली खोली छोटीशीच पण आरामशीर होती. त्यामुळे पलंगावर आडवं होताच झोप लागली.

सकाळी जाग आली तेव्हा चांगलं उजाडलंय असं लक्षात आलं. खिडकीला लावलेल्या पडद्यातून आकाशाचा निळा तुकडा दिसला आणि एकदम हुषार वाटलं. झटकन उठून मी गॅलरीकडे जायचा दरवाजा उघडला आणि गॅलरीत पाऊल टाकलं - ताज्या, थंड हवेनं शिरशिरी भरली आणि उन्हाचा कवडसा पकडावासा वाटला. पूर्वेकडे पाहिलं तर सकाळच्या उन्हात टिएनशान पर्वताची शिखरं निळ्या तेजाने झळाळत होती. हिमशिखरांचं पहिलं दर्शन नेहमीच माझ्या मनावर जादू करून जातं. पहिली जाणीव होते, प्रचंड रितेपणाची. शरीर आणि मन निववून जातंय, कोरडं ठणठणीत होतंय, त्याच्या खुजेपणाची जाणीव तीव्र होतीय असं वाटतं. पण दुसऱ्या क्षणी त्या सुवर्णतेजानं मन काठोकाठ भरतं, ~~आत~~ आत्मविश्वासानं शरीर फुलारतं, कल्पने-ला पंख फुटतात, सारं जग आपलं वाटायला लागतं,

आणि कोणतीही गोष्ट हातांत घ्या, यश मिळणारच अशी खात्री वाटते.

किरगिजीस्तानातल्या पहिल्या दिवसाची सुरु-वात अशी प्रचंड उत्साहवर्धक झाली. गॅलरीतून दिस-णारं बिशकेक शहराचं ~~दिसणारं~~ रूपडंही लोभस होतं. हॉटेलसमोर मोठा चौक होता. त्यात एक भव्य शिल्प होतं. जणू काही आपण मनाराच्या राज्यात येऊन पोहोचलो आहोत, असं भासविणारं. रुंद रस्त्यांच्या कडेनं असलेल्या पोपलरच्या झाडांना कोवळी हिरवी पालवी होती. रस्त्यावर तुरळक वाहनं होती. गर्दीही नव्हती. सगळं वातावरण विलक्षण स्वच्छ, टवटवीत आणि निर्भर वाटलं. इतकं की रस्त्याच्या पलीकडे कॅसिनो आहे, हे लक्षात येऊनसुद्धा बिशकेकची सुभगता कमी झाल्यासारखी वाटली नाही.

थोड्याच वेळात योसरची लाल लॅन्डरोव्हर हॉटेल-च्या दिशेनं येताना मला दिसली आणि पाच-सात मिनिटातच योसा माझ्या खोलीत हजर झाला. "इतक्या सहजपणे तू बिशकेकला येऊन पोहोचशील असं मला वाटलं नव्हतं!" तो हसत म्हणाला. "मला वाटत होतं की मध्यरात्री कोठून तरी तुझा फोन येणार आणि मला धावाधाव करावी लागणार."

"मी इथे आलोय यावर माझाही अजून विश्वास बसत नाहीये!" मी उत्तरलो. "पण विमान उशिरा आलं तरी तुझा ड्रायव्हर माझ्या नावाची पाटी घेऊन विमान-तळावर उभाच होता. त्यामुळे झटपट इथे पोहोचलो." मी म्हणालो.

"आता प्रथम हॉटेलमधून बाहेर पडू आणि मग सावकाश बोलू," योसा म्हणाला आणि खांद्यावर पिशवी अडकवून मी त्याच्यापाठोपाठ बाहेर रस्त्यावर आलो. थंड हवेनं छान जाणीव करून दिली की आपण

कोठतरी उत्तरेकडे आहेत. हॉटेलसमोरच्या भव्य चौकातून आम्ही शहराकडे निघालो. आखीव, रेखीव विशेषच मला आवडलं. रुंद रस्ते आणि त्यांच्या कडेनं ओक, मेपल, पोपलर अशी झाडं लावलेली. रस्त्यावर रशियन बनावटीच्या मोटारींची रहदारी पण पादचारी नाहीत की दुकानंही नाहीत. रस्त्याच्या दोन्ही बाजूला बागा. मला आश्चर्य वाटलं. "अमेरिकेसारखं इथंही कोणी रस्त्यावरून चालत नाही वाटतं!" मी योसलला म्हणालो.

"चालतात की," योसल उत्तरला. "दोन्ही बाजूला ज्या बागा दिसताहेत, त्यामधून पादचाऱ्यांसाठी वाटा आहेत. रस्ता ओलांडायचा झाला तरच त्यांना झेब्रा क्रॉसिंगवर यावं लागतं." तो म्हणाला.

"मला ह्या पायवाटांवरून चालावंसं वाटतंय" मी त्याला म्हटलं. योसलनं गाडी एका कडेच्या छोट्या रस्त्यावर वळविली आणि उभी केली. आम्ही उतरून बागांतील पायवाटेवर आलो. पायवाट फरशीनं बांधून काढली होती. तीवर झाडांची दाट छाया होती. दोन्ही बाजूला मोकळ्या जागा होत्या. त्यात विश्रांतीसाठी बाकं ठेवलेली होती. लोक शांतपणे जात येत होते. काही बाकांवर उन्हाचे कवडसे पकडून बसले होते. कुठे फिरस्त्यांची गर्दी नाही, वाहनांचा कर्कशपणा नाही की जाहिरातींचा झगमगाट नाही. सारे कसे शिस्तशीर, शांत आणि सौंदर्याला जपणारे. पादचाऱ्यांची एवढी काळजी!!

"मग दुकानं, ऑफिसेस, लोकांचे बंगले, अपार्टमेंटस् कुठे आहेत?" मी विचारलं.

"दुकानांचे रस्ते निराळे आहेत" योसल म्हणाला. "तिथेच छोटे बाजार, स्टॉल्स आहेत. हमरस्त्यावर एखादंच दुकान असतं, डिपार्टमेंटल स्टोअर सारखं. पण त्यांना रस्त्यावर शो करायला, काचेच्या तावदानामागे वस्तू ठेवायला बंदी आहे. त्यामुळे रस्ते एवढे शांत दिसतात. आणि ऑफिसेस म्हणशील तर ती या बागांच्या पलीकडे

असलेल्या इमारतींतून आहेत. आणि बंगल्यांना प्रश्नच नाही. इथे पूर्वी कम्युनिस्ट राज्य होतं, हे विसरून नकोस. त्यामुळे प्रत्येकजण लहानमोठ्या फ्लॅटमध्ये राहतो. ती राजवट गेल्यापासून अलिकडे व्यापारामुळे श्रीमंत झालेले लोक शहराबाहेर "दाचा" बांधायला लागलेत," योसाने माहिती पुरविली. "आधी आपण थोडी न्याहरी करू आणि मग फिरायला जाऊ" तो पुढे म्हणाला. त्याने गाडी वळविली आणि आम्ही एका साइड-स्ट्रीटवर आलो. समोरच एक कॅफेटेरिआ होता. रस्त्याच्या कडेला कठड्यामागे टेबल-खुर्च्या मांडलेल्या होत्या. त्यावर पांढरेशुभ्र टेबल-क्लॉथ होते. चार-दोन मंडळी बसून गप्पा छाटीत होती. मंगोलियन चेहरेपट्टी आणि शर्ट-पँट, कोट असाच पुरुषांचा वेष. बायकांचा वेष पाश्चात्य पद्धतीचा – फ्रॉक, स्कर्ट, केस बॉब केलेले. रशियन चेहरेपट्टीचीही काही माणसे. आतल्या बाजूला पांढरा पोशाख केलेले दोन बवर्जी मांस भाजत होते. खाद्यपदार्थ घेऊन येणाऱ्या वेट्रेस रशियन वाटत होत्या. इथलं स्वच्छ, प्रसन्न वातावरण मला आवडलं. मांसाहार मला वर्ज्य नसलं तरी मी ते फार नवीनं खात नाही, हे योसाला माहीत होतं. तेव्हा त्यानं रशियन भाषेत माझ्यासाठी पिझ्झा मागविला आणि त्याबरोबर बिनदुधाचा चहा! माझ्या लक्षात आलं की इथे पाणी कोणी पीत नाही, प्यायला मिळतही नाही. मिनरल वॉटर म्हणून बाटल्यातून जे मिळतं, तो असतो सोडा. पाण्याऐवजी सोडा पिणं हा बदल पचनी पडायला वेळ लागला.

"इथली हॉटेलं बहुतेक तुर्की लोक चालवतात," योसाने सांगितलं. "कम्युनिस्ट राजवट संपल्यावर तुर्कस्तानमधून बरेच लोक इथे आले. त्यांची आणि किरगीज लोकांची भाषा खूप सारखी आहे." तो म्हणाला. शिवाय आता इटालिअन, स्पॅनिश या लोकांनीही इथे रेस्टॉरंट्स

उघडली आहेत. संध्याकाळी एका इटॅलियन रेस्तोराँमध्ये तुला घेऊन जाईन," तो पुढे म्हणाला.

"थँक्स!" मी म्हटलं. "शहराबाहेर पडण्यापूर्वी बाजारातून आपण एक चक्कर मारू."

न्याहरी आटपून आम्ही चालत चालत आमरखी एका छोट्या रस्त्यावर आलो. इथे दोन्ही बाजूला लहान लहान स्टॉल्स होते. ते चालविणाऱ्या बहुतेक बायका होत्या. भाजी, ब्रेड, खास किरगीजी पद्धतीचा भाकरीसारखा जाड ब्रेड, थोडी फार फळं, गुलाबाची फुलं व त्यांच्या रचना आणि इतर गृहोपयोगी वस्तूंची लहान लहान दुकानं होती. पेप्सी, कोका-कोला यांचं अस्तित्व जाणवण्या-सारखं होतं. किरगिझीस्तानचं खुली अर्थव्यवस्था स्वीकारल्याचा हा परिणाम. परकीय भांडवल देशात येत होतं. पण ते सारं चैनीच्या, भपकेबाज वस्तूंमध्ये गुंतविलं जात होतं. उदाहरणार्थ, दारू, आइस्क्रीम, जीन, कॉस्मेटिक्स वगैरे. जे आपल्याकडे यत्रतत्र दिसतं, गोंगाट, अस्वच्छता, कचऱ्याचे ढीग बाजारातही कुठे दिसले नाहीत, याचं आश्चर्य वाटलं.

परक्या देशातून असा फेरफटका मारण्यात नेहमीच आनंद असतो, कारण नवनव्या गोष्टी पहायला मिळतात. पण हा पाहताना मनावर विषण्णतेचं सावट मात्र सतत येत असतं. इतकं सौंदर्य, इतकी परिसराची काळजी घेतलेली दिसली की आपल्याकडच्या परिस्थितीशी मनातल्या मनात सहजच आपण तुलना करीत जातो आणि प्रत्येक बाबतीत आपला देश, आपले लोक उणे पडतात, हे पाहून वाईट वाटत राहतं. असं वाटतं की आपल्या इतका आपला देश, मुलुख आणि निसर्ग कोणीच वाईट प्रकारे वापरीत नाही. अस्वच्छता, गलिच्छता, बाजारी आणि [illegible] यांचं अविच्छिन्न प्रदर्शन म्हणजे भारतीय उपखंड — भारत, पाकिस्तान आणि बांगला देश. आपल्या या बेफिकीर

वृत्तीला कळस म्हणजे आपली धार्मिक स्थाने. जिथे लोक पुण्य मिळवायला जातात, तिथे सर्वात जास्त अस्वच्छता आणि बाजारी, गल्लाभरू वृत्ती दृष्टीस पडते. एखाद्या रम्य ठिकाणी सर्वात अस्वच्छ व गलिच्छ जागा कोणती असेल तर ती म्हणजे तिथल्या देवळाचा परिसर. जाज्वल्य देशाभिमान असणाऱ्यांनाही आपल्या देशाची भूमी, निसर्ग, पाणी यांची बेइज्जत करताना खंत वाटत नाही. खरं तर कोणाही सुशिक्षित माणसाचे स्वच्छता राखणे हे कर्तव्यच आहे. त्यासाठी निसर्गप्रेमी, पर्यावरणवादी असावं लागत नाही. पण शिक्षणाचा प्रसार झाला तरी गेल्या पन्नास वर्षांत आम्ही नागरिकाची कर्तव्ये पाळायला आजिबात शिकलो नाही; उलट ती न पाळण्यात धन्यता मानण्यास शिकलो, असं म्हणावं लागतं!

त्या दिवशी बिश्केकच्या परिसरात आम्ही खूप हिंडलो. सर्व शहरात, एवढंच नव्हे तर ग्रामीण भागात कमालीची स्वच्छता दिसली. कुठे उकिरडे नाहीत, विष्ठा नाही की प्लॅस्टिकच्या पिशव्यांचे ढीग नाहीत. त्यामुळे रस्त्याकडेला कुठेही थांबावं, बाजूच्या हिरवळीतून, झाडीतून फिरावं यावं, वसंत ऋतूत उमलणाऱ्या रानफुलांना हिंडत, थांबत आस्वाद घ्यावा. रस्त्याने प्रवास करताना असे कित्येक लोक, कुटुंबं, बाजूच्या झाडांखाली, ओढ्याकाठी बसून पिकनिक करताना आढळले. ठराविक थांब्यांवर बसून विक्रेतेही खाद्यपदार्थ-पेये विकताना आढळले. पण सभोवती कोठेही कोणी घाण केलेली दिसली नाही की कचरा सांडलेला दिसला नाही.

सोविएट रशियाची सत्ता किरगिझीस्तानात १९९० सालापर्यंत होती. मॉस्कोतील सत्ताधाऱ्यांनी व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी केली असली, मध्य आशियातील देशांची आर्थिक पिळवणूक केली असली, तरी या भटक्या लोकांना दोन महत्त्वाच्या गोष्टी दिल्या. एक म्हणजे शिक्षण व दुसरी शिस्त.

शिक्षणाबरोबरच कझाक-किरगीज लोकांनी आधुनिक विचार-
-धारा उचलल्या, आधुनिक तंत्रे व शास्त्रे, मग त्यात अभियां-
-त्रिकी, भूशास्त्र, वनस्पती व प्राणिशास्त्र आले, — आत्मसात
केली. रशियन भाषा सार्वत्रिक झाल्याने त्या भाषेतील उत्तम
वाङ्‌मयाचा प्रसार झाला. स्थानिक भाषांनाही प्रोत्साहन मिळाले.
त्यातील वाङ्‌मय रशियन भाषेत आले. भाषांतराद्वारे जगातील
इतर वाङ्‌मय व शास्त्रे यांचाही परिचय होऊ लागला. त्यामुळे
इस्लामचे पुनरुत्थान झाले, मतासचा मनासरखान झाला, तरी
त्या धर्मातला कडवा पुराणमतवाद इथे रुजला नाही. जागो-
-जागी मशिदी दिसतात पण धर्मनियमांना कडकपणा कोठेही
आढळत नाही. महिला तर पडदानशीन नाहीतच उलट आपल्या
देशाप्रमाणे पुरुषांच्या क्षेत्रांत मोकळेपणाने वावरताना दिसतात.
खेडेगावात तर किरगिझी महिलाच दुकाने, खाद्यपेयांचे स्टॉल्स,
शाळा चालविताना दिसतात.

किरगिझीस्तानात फिरताना स्थानिक थांब्यांवर
आम्ही कित्येकदा नाश्त्यासाठी थांबलो. रस्त्याकडेला असलेली ही
खाद्यपेयांची दुकाने म्हणजे गोल आकाराचे मंगोलियन तंबू.
त्यांना युर्त म्हणतात. आत चहूकडे सुंदर गालिचे अंथरलेले,
तंबूच्या कडांही गालिच्यासारख्या सुंदर वॉल हँगिंग्जने सजवि-
-लेल्या; तंबूच्या आत आणि आजूबाजूला कमालीची स्वच्छता.
आत लहान बसकी टेबले मांडलेली. त्याभोवती मांडी घालून
बसावे किंवा उशांवर वा बैठ्या बाकांवर बसावे. मंद प्रकाशाचे,
प्रसन्न वातावरण. चिनी मातीचे नाजूक, नक्षीदार, स्वच्छ
बाऊल्स, डिशेस आणि कप किंवा मग. हसून, अदबीने,
प्रेमाने स्वागत करणाऱ्या, खाद्यपदार्थ आणून देणाऱ्या किर-
गिझी स्त्रिया. त्यांच्या चेहरेपट्टीवरून, सौम्य वृत्तीवरून मला
लडाखी महिलांची आठवण झाली. मला सतत त्यावरून
वाटत राहिले की कधीतरी या मुलुखात बुद्धधर्माचा
प्रभाव असणार. आणि सपाट, सखल प्रदेश सोडून जेव्हा
आम्ही टिएनशानच्या पर्वतीय भागात फिरू लागलो, तेव्हा

ते बरोबर असल्याचं कळलं. लडाखमध्ये आढळतात तशा पताका लावलेल्या जागोजाग दिसल्या. कडेला एखाद्या झाडाखाली, मोठ्या दगडाआड छोटी मंदिरं आणि त्यांना जोडलेल्या पताकाही दिसल्या. लडाखमध्ये त्यावर ओम् मणि पद्मे हुम हा मंत्र लिहिलेला असतो. तो मंत्र लिहिलेल्या दगडांच्या कपच्याही असतात. त्या इथे आढळल्या नाहीत. पण कुठतरी हृदयांत बौद्ध धर्माच्या चालिरीतींचा प्रभाव या लोकांमध्ये आहे, ही जाणीव झाली.

इसवी सनाच्या पहिल्या, दुसऱ्या शतकात बुद्ध धर्म इथे पोहोचला असावा. लडाख-तिबेट मधल्यासारखे "मोने" मला कुठे दिसले नाहीत. पण डोंगरातल्या रस्त्याच्या कडेने रचलेले दगड, डोंगरातील खिंडीच्या माथ्यावर दगड रचून तिथे लावलेल्या पताका या खुणा लोकांच्या मनावर असलेला या धर्माचा प्रभाव आजही दाखवीत होत्या. कदाचित तिबेटमधून बुद्धधर्म इथपर्यंत पोहोचला असावा. इतिहासाच्या अशा खुणा दिसल्या की त्या त्या प्रदेशाशी, निसर्गाशी आपलं नातं दृढ होत जातं. लोकांचा परिचय, मैत्री होण्यास त्या मानाने वेळ लागतो.

इसवी सनापूर्वी कित्येक शतके इथे शक लोकांची सत्ता असावी. हेच शक नंतर भारतात आले, आणि त्यांनी साम्राज्य स्थापिले. त्यांच्याकडूनही बुद्धधर्माचे वारे मध्य आशियात पोहोचले असावेत. त्यानंतर तिनशे-चारशे वर्षे तरी बुद्ध धर्म इथे नांदला असावा. इ. स. ५००च्या सुमारास सायबेरिआतून इथे लोकांचे आगमन झाले. या लोकांच्या भाषेचे फिनलंड आणि हंगेरी येथील भाषांशी साम्य असल्याचे सांगितले जाते. हंगेरिअन लोक आणि भारतात आलेले आर्य यांचा संबंधही जुळविला जातो. "हंगेरीतील माग्यार लोक इंडो-युरोपीय लोकांच्या पूर्वजांना जवळचे असल्याचे सांगितले जाते. मध्य आशियापासून थेट सायबेरिआ पर्यंत पसरलेल्या लोकांचे एकमेकांशी दळणवळण व व्यवहार असावेत असे दिसते. या नवीन आलेल्या लोकांच्या प्रभावाखाली इथला

बुद्धधर्म हद्दपार केला गेला असावा.

त्यानंतर अरबांनी इथे इस्लामच्या प्रसाराला सुरुवात केली; आणि ओस या दक्षिणेकडच्या शहरात आपले प्रमुख केंद्र स्थापन केले. इ. स. १२०८ मध्ये चेंगिझखानाचा उदय झाला. त्याने जिथे आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करून मोहिमांना सुरुवात केली, ती जागा बिश्केकच्या पूर्वेस टोकमाक या गावाजवळ आहे. चेंगिझखानाने किरगीज टोळीवाल्यांचा पराभव केला. मंगोल टोळ्यातील आपसातील यादवीमुळे बाबरालाही किरगीजीस्तानात आश्रय घ्यावा लागला होता. ही घटना आहे सोळाव्या शतकातली. १७व्या शतकात झारचे रशियन सैन्य इथे येऊन पोहोचले. मंगोल आणि चिनी लोकांच्या हल्ल्यांमुळे त्रासून गेलेल्या किरगीज लोकांनी प्रारंभी त्यांचे स्वागतच केले. १९व्या शतकाच्या अखेरी-पर्यंत रशियाने आपली सत्ता या प्रदेशात पक्की बसविली. या भटक्या लोकांच्या जीवनाला वेगळे वळण लागावे म्हणून रशियन सम्राज्ञी कॅथेराईन दुसरी, हिने इस्लामच्या प्रसारासाठी उत्तेजन दिले! पण त्याबाबतीत किरगीज उदासीनच राहिले. मग रशियाने आपल्या लोकांना इथे वसाहती करण्यास पाठविले. १९०६ ते १९१२ या काळात सुमारे पाच लाख रशियन व युक्रेनियन लोकांनी इथे येऊन शेती करण्यास सुरुवात केली. भटक्या किरगीज लोकांच्या टोळ्यांचे कुरणांचे क्षेत्र त्यामुळे कमी झाले आणि रशियन सत्तेविरुद्ध असंतोषाचे बीज रोवले गेले. पहिल्या महायुद्धात त्यांनी रशियाच्या बाजूने भाग घेतला असला तरी रशियन वसाहतवाले आपल्या जमिनी बळकावितील या भीतीने त्यांनी बंडही केले. पण ते दडपले गेले आणि कित्येक किरगिजी लोकांनी चीनमध्ये स्थलांतर केले. नंतर बोल्शे-विकांच्या लाल सेनेने इथे ~~रशियन~~ कम्युनिस्ट सत्ता स्थापन केली. १९२१ साली सोव्हिएट सत्तेने वसाहतवाल्यांनी बळकाविलेल्या बऱ्याचशा जमिनी किरगीज लोकांना परत केल्या. १९२४ पासून किरगिजी-स्तान सोविएट संघराज्याचा भाग बनले. बिश्केकचे नाव फ्रुंझ ठेवण्यात आले. आता ते पुन्हा बिश्केक झाले आहे.

लेखांक ३ : पर्वत, पाणथळी आणि सळ्मा 

## मेरु पर्वता पायथ्याशी

बिश्केक शहर तसं छोटेखानी आहे. त्यामुळे शहराची वस्ती ओलांडून ग्रामीण मुलुखात पोहोचायला फारसा वेळ लागत नाही. एखाद्या चौकात शहरातला केंद्र रस्ता येऊन थबकतो आणि तिथे निरनिराळ्या दिशांना जाणारे तीन-चार लहान रस्ते फुटतात. आज योसेने लॅण्डरोव्हर तशाच एका लहान रस्त्याला वळविली. दोन्ही-बाजूच्या झाडांनी रस्त्यावर छत धरले होते. पण थोड्याच वेळात हे छत्रधारी संपले आणि आम्ही मोकळ्यावर आलो. दोन्ही बाजूंना आता हिरवीगार कुरणे होती. त्यामध्ये रानफुले फुलली होती. मधूनच वळणावळणाने जाणारा ओढा लागे. त्याकाठी विलोची झाडे वाकून पाण्याला स्पर्श करताना दिसत. ओढ्याकाठच्या बाजूला एखादा माणूस गळ टाकून बसलेला दिसे. दूर पार्श्वभूमीला होते टिएन-शानचे हळुवार उतार, हिरव्या मखमलीने नटलेले आणि माथ्यावर हिमाचे शुभ्र मुकुट चढविलेले. इथे टिएनशानचं रूप इतकं सोनसावळं वाटलं की त्याच्याशी एकदम मैत्री जडली. हिमालयाची उंची, त्याचा विस्तार, त्याचा अफाट-पणा यांचं मनावर एकप्रकारचं दडपण येतं. इथे असं वाटत होतं की आपण सहज हसत-खेळत या शिखरां-पर्यंत जाऊन येऊं. मी योसेला म्हटलंही, "टिएनशानचे हे उतार इतके सौम्य आहेत की त्यावर गाडी चढवायला काय हरकत आहे?"

"जरूर!" योसे म्हणाला. "तिथेही जाणार आहोत आपण. पण आधी व्हॅली पाहून येऊ."

त्यानं व्हॅली हा शब्द उच्चारताच मला एकदम जाणीव झाली की आपण जे दृश्य पाहतो आहोत त्याचं काश्मीर व्हॅलीशी साम्य आहे. तसाच हिरवा मुलुख, विलो आणि पोपलरची झाडं, कॅलथा, रॅनन्क्युलस, डेल्फि-निअमची रानफुलं आणि तसेच आनंदी, काहीसा बेफिकीर वृत्तीचे लोक. ओळख नसतानाही हसून तुमच्याकडे पाहणारे,

गाडीतून जाताना सहजपणे हात हलवून अभिवादन करणारे.

योसने गाडी आता एका कच्च्या रस्त्यावर घेतली. ओढ्याच्या बाजूने ही वाट एका लहानशा टेकडीकडे जात होती. वळणावळणाने, त्या कच्च्या वाटेवरून धक्के ठेचकाळत आम्ही टेकडीजवळ आलो. तिथे टेकडीला एक मोठं भगदाड होतं, डोंगरउतार कापून काढल्यासार-खा दिसत होता; आणि त्याला असंख्य भोकं होती. या भगदाडापाशी चाळीस-पन्नास पक्षी घोंघावत होते. कोणी शीळ घालीत, पंख पसरून घिरट्या घालीत होते, कोणी पंख फडफडवीत हवेत उंच चढत होते आणि सूर मारून खाली येत होते तर कोणी त्या उताराला घट्ट चिकटून होते. हिरव्या, सोनेरी, तांबड्या रंगाचे हे पक्षी विलक्षण सुंदर होते. या पक्ष्यांनी काश्मीर-शी गुंफलेला माझ्या मनातला धागा आणखीनच पक्का केला. कारण त्यांना मी प्रथम पाहिले होते, काश्मीरमध्येच. आपल्या वेड्या राघूचे (ग्रीन बी-ईटर) हे युरोपीय जातभाई. आपला पक्षी हिरवाकंच आणि गळ्याशी निळसर तर हे पोटाशी निळसर, डोकं आणि पाठ लालसर व गळा सोनेरी असलेले. काश्मीरमध्ये मी त्यांची घरटी पाहिली नव्हती, ती आज पहात होतो. डोंगर-उताराला खोलवर बिळं पाडून त्यांत हे अंडी घालतात. त्यांची एवढी मोठी वसाहत पहायला मिळणं ही अपूर्वाई होती. "काय खूष की नाही?" योसा-ने मला विचारलं.

"बिलकूल!" मी उत्तर दिलं. "असं दृश्य पहायला भाग्य लागतं" मी म्हणालो.

टेकडीच्या बाजूने एक ओढा वहात होता. त्याच्या रुंद पात्रात वाळू पसरली होती आणि त्यावर एक करडा बगळा ध्यानस्थ उभा राहून भक्ष्य आटोक्यात येण्याची प्रतीक्षा करीत होता. ओढ्याच्या खोलसर पाण्यात पिवळट चोच आणि गळ्याखाली पांढरी पिसे

असलेला मोठा पाणकावळा मासे पकडण्यासाठी डुबक्या मारीत होता. आम्ही थोडं आणखी पुढे जायचा प्रयत्न करताना क्वॅक क्वॅक असा आवाज देत बदकांची एक जोडी ओढ्याकाठच्या दलदलीतून उडाली.

"कॉमन टील" त्यांच्यावर दुर्बिणी रोखत आम्ही दोघे एकदमच उद्गारलो.

गंमत अशी की हे सारे पक्षी आम्ही दोघांनी भारतात पाहिले होते — काही स्थानिक रहिवासी म्हणून, काही स्थलांतरीत म्हणून. नेहमी हिवाळ्यात भेटणाऱ्या बदकांना त्यांच्या देशी, त्यांच्या घरी पाहण्याचं भाग्य मला आज लाभत होतं. जणू बदकी बाळंतपणासाठी माहेरी आली होती आणि बदक तिला साथ देत होतं!

एवढ्यात पंधरा-वीस भोरड्यांचा थवा आमच्या डोक्यावरून उडत गेला. पुण्याजवळच्या वडांवर कर्कश दंगा करणारे हे सुंदर गुलाबी पक्षी आता भारतातून इथे येऊन पोहोचले होते. हिवाळ्यात मनुष्यवस्तीच्या आसपासच फिरकणारे आणि प्रसंगी शेतातल्या पिकांचं आणि बागांतल्या फळांचं नुकसान करणारे हे पक्षी आता इथे खेडेगावच्या आसपास, घरांच्या छपरा-तून, भिंतीतील भोकातून घरटी बांधतील आणि पिलं वाढवितील. आपल्या पिलांना टोळ आणि इतर उपद्रवी कीटक आणून भरवितील. पिकांचं नुकसान केल्याची भरपाई ते शेतकऱ्यांचं टोळधाडीपासून संरक्षण करून भरून काढतात.

किती सहजपणे हे पक्षी एका देशातून दुसऱ्या देशात जाऊ शकतात. तसं माणसांना जाता आलं तर! आम्ही माणसं, आपले अहंकार जपण्यासाठी — मग ते जाती-जमातींचे असोत, धर्मांचे असोत, राष्ट्रांचे असोत, — अभेद्य भिंती एकमेकांमध्ये बांधून बसतो. आपली जीवनपद्धती, आपले आचार-विचार, आपली संस्कृती

त्यांवर इतरांचं आक्रमण होईल आणि आपली अस्मिता हरवावली जाईल, म्हणून सतत बचावात्मक भूमिका घेऊन असतो. निसर्गातही अस्मिता आहे. एखाद्या प्रदे-शावर, आसऱ्यावर हक्क प्रस्थापित करून इतरांना त्यापासून दूर करण्याचे प्रकार आहेत. पण हे सारे तात्पुरते, विशिष्ट उद्देशाला धरून असते. ते काम, तो काळावधी संपला की या भिंती नाहीशा होतात. विविध-तेतून एकता हे निसर्गाचे तत्त्व आहे. मानवी बुद्धीने प्रगल्भतेच्या कितीही भराऱ्या मारल्या तरी ही एकता तिला असाध्य दिसते. कारण प्रत्येकाचा अहम्. तो गळून पडेल तेव्हाच निसर्गाच्या शाश्वत स्थानात मानवी जीवन विलीन होईल. नाहीतर हा अहम् सावकाश त्याला विनाशाकडे नेत राहील.

माझ्या घरापासून दूर, [illegible] मुकुंदवनात फिरताना निसर्गातल्या एकतेची मी प्रतीती घेत होतो, मनात विचारांची गर्दी होती, तरी एक प्रकारची तृप्तीही मी अनुभवित होतो.

मी माझ्यातच इतका गुंगलो होतो की योरसने गाडी केव्हा एका टेकडीवर चढवायला सुरुवात केली ते लक्षातच आले नाही. एका छोट्या टेकडीच्या उतारावरून आम्ही जात होतो. हा मुकुंदवनचा कुरणाच्या टेकड्यांचा होता. या टेकड्यांवर गवताच्या थरांचं जाड कवच असायचं. कारण खडक कुठे दिसत नव्हता. त्यामुळे टेकड्यांवर शेतं लावली होती. कुठे गहू, तर कुठे अल्का अल्का हा चारा. काही शेतं रिकामीच होती. इक आगारची ओळखीच्या पक्ष्यांची भेट झाली. रेड-हेडेड बंटिंग, औरंगाबादजवळ पाहिलेला, ककरस बॅक-ड श्राईक किंवा स्वाटिक, भारतात सर्वत्र आढळणारा, घार, सर्वांच्या परिचयाची आणि कधू - हिमालयातून, युरोपातून भारताच्या सखल भागात स्थलांतर करणारी.

या भुरक्या टेकड्यांच्या अधूनमधून ज्या खोलगटी होत्या, त्यात पाणी साचून लहान-मोठी तळी तयार झाली होती. ही उथळ तळी - ज्यांना वेटलँड्स म्हणून ओळखलं जातं - असंख्य पाणपक्ष्यांना आसरा पुरवितात. त्यांच्या पोटात, पृष्ठभागावर आणि काठावर अनेक प्रकारच्या वनस्पती वाढतात. त्या पक्ष्यांना, प्राण्यांना अन्न, निवारा, शत्रूपासून संरक्षण पुरवितात. त्यातल्या काही माणसांनाही उपयोगी येतात - अन्न म्हणून, कच्चा माल म्हणून, आच्छादन म्हणून. त्यामुळे "वेटलँड्स" ही एक अत्यंत उपयुक्त, श्रीमंत परिसंस्था समजली जाते. किरगिझिस्तानातल्या या वेटलँड्समध्ये मला कितीतरी ओळखीच्या वनस्पती भेटल्या — फ्रॅग्माइटीस हे पाण-झुडुप, पाण्यात वाढणाऱ्या पोटॅमोजिटॉन व मिरिओफायलम वगैरे. तसेच ओळखीचे पक्षी. तळ्याकाठच्या झुडुपांत लपून बसणारा लिटल बिटर्न हा पक्षी मी काश्मीरमध्ये पाहिला होता, तो इथे पुन्हा पाहिला. तळ्याकाठच्या वनस्पतींमध्ये उतरला की बेमालूम त्यांत मिसळून जाणारा हा पक्षी, त्यांतून उडाला की मगच दिसतो आणि पांढऱ्या, गुलाबी पंखांमुळे ओळखता येतो. ब्लॅक विंग्ड स्टिल्ट किंवा शेकाट्या — मुळा-मुठेवर हिवाळ्यात मोठ्या संख्येने आढळणारा — येथेही हजर होता. गार्गनी, व्हाइट आईड पोचार्ड ही पुण्याजवळच्या तळ्यांवर हमेशा आढळणारी बदकं इथे उन्हाळ्यात घरटी करण्यासाठी येऊन पोहोचली होती; आणि पुण्याजवळचं अप्रूप, क्वचित एखादंच दिसणारं मॅलार्ड हे बदकही इथे भरपूर संख्येने दिसत होतं. पाषाण तलावावरची जांभळी पाणकोंबडी जेव्हा इथे भेटली तेव्हा गल्लीतली मैत्रीण भेटल्याचा आनंद मी अनुभवला!

दुसरी योसाने मला एका विस्तीर्ण जलाशयाच्या काठी नेले. दोन डोंगरांमधल्या अरुंद जागेत धरण बांधून

ही नदी अडविली होती आणि जलाशय निर्माण केलेला होता. हा बिश्केकला पाणीपुरवठा. पुण्याच्या खडक-वासला आहे तसा. पण या तलावाचे चारही काठ संरक्षित केलेले होते. इथे शेती, गुरांची चराई, वस्ती, वगैरे मानवी उपक्रमांना बंदी होती. तलावाचं पाणी स्वच्छ रहावं, त्यात प्रदूषण शिरू नये म्हणून! मला खडकवासला तलावात डुंबणाऱ्या म्हशी आणि धुतल्या जाणाऱ्या ट्रक आणि मोटरसायकली-रिक्शा यांची आठवण झाली. स्वत:च्या पिण्याच्या पाण्याबद्दलसुद्धा शासन आणि जनता यांची बेफिकीरी मी भारतात नित्य अनुभवित होतो. इथे निराळं चित्र पाहून बरं वाटलं.

जलाशयाभोवतीच्या टेकड्या संरक्षित केल्या-मुळे इथे विस्तीर्ण कुरणे तयार झाली होती. गवताळ, मैदानी प्रदेश आणि त्यात अधूनमधून असणारी झुडुपं यांमुळे इथे एक निराळाच आसरा तयार झाला होता आणि इथले पक्षीही निराळे तरीही परिचित होते. आपल्याकडचे लार्क (चंडोल) आणि पिपिट, सालिम अलींमुळे प्रसिद्धी पावलेली, छातीवर पिवळा ठिपका असलेली चिमणी, आपल्या शेतांतून हिवाळ्यात भेटणारा रोझफिंच, लडाखमध्ये भेटलेले ट्वाईट आणि लिनेट आणि काश्मीरमधले गोल्डफिंच आणि ग्रीन-फिंच ही सारी मंडळी इथे भेटली. शिवाय पुण्याजवळ कवडी येथे आणि उजनी धरणाच्या परिसरात भेटणाऱ्या प्रॅटिनकोल पक्ष्याचा मोठा भाई युरोपियन प्रॅटिनकोल याच्या उड्डाणलीला पहायला मिळाल्याने दिवसभराच्या पक्षी-निरीक्षणाची उत्तम सांगता झाली.

दिवसभर आम्ही भटकत होतो, कधी मोटारी-तून तर कधी पायउतार होऊन. पक्षी पाहून मन तृप्त झालं तरी पोटातले कावळे ओरडत होते. टेक-डीवरून दिसणाऱ्या सूर्यास्ताचं सौंदर्य पाहून आम्ही बिश्केकला परत फिरलो. येताना शहराच्यासारखी

आपली लॅन्डरोव्हर एका रेस्तोरॉं पुढे उभी केली. ते जग्योनेच उघडलेले इटालिअन रेस्टॉरंट होते!

"हाय योसा! हाऊ आर यू?" आम्ही आत शिरताना आम्हाला पाहून एक तरुणी हसत पुढे आली. ती श्यामलवर्णीय होती, गौरवर्णीय नव्हती. मला आश्चर्य वाटलं.

"सल्मा! तू आमच्यात सामील का होत नाहीस? आपण बरोबरच जेवण घेऊ," तिच्याशी हस्तांदोलन करीत योसा म्हणाला.

"वुइथ प्लेझर, आनंदाने!" ती उतरली आणि खुर्च्या ओढून आम्ही एका टेबलाभोवती बसलो.

तिने माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले.

"हा प्रकाश, भारतातून आलाय, पक्षी पहायला!" योसाने माझी ओळख करून दिली. "आणि सल्मा कॅनडाहून आलीय, इथल्या ग्रामीण भागांत काम करण्यासाठी," आम्ही हस्तांदोलन केले.

"मी आता कॅनेडिअन आले असले तरी माझा जन्म गुजरातमधला. माझे आई-वडिल पाकिस्तानात असतात आणि नातेवाईक मुंबईत आहेत," सल्मा म्हणाली.

"म्हणजे आपल्या पक्ष्यांच्या भाषेत सांगायचं की आपण दोघंही एक स्थलांतरीत आहोत," मी म्हटलं.

"मला मुंबईची बातमी सांग, लहानपणी मी तिथं होते, ते शहर मला खूप आवडायचं," सल्मा म्हणाली. "मला पुन्हा मुंबई पहायचीय."

आता हिला मुंबईची बातमी काय सांगायची? मी विचारात पडलो. तिथली गर्दी, तिथले महाल आणि झोपडपट्ट्या का तिथली सिनेसृष्टी आणि टोळीयुद्धे? काय सांगावं तिला?

"मुंबईचं मरिन ड्राइव्ह आणि तिथला समुद्रकिनारा

चार खान आहेत," मी उत्तर दिलं.

"मला तिथे पोहोता येईल? या देशात समुद्र नाही, त्यामुळे मी खूप रखडू होते."

"कोण जाणे! पण मुंबईच्या दक्षिणेला खूप सुंदर बीचेस आहेत, तिथे जरूर पोहोता येईल." माझ्या डोळ्या-समोर कोकणची किनारपट्टी उभी राहिली.

"इथलं काम संपलं की पुढच्या वर्षी मी नक्की मुंबईला येणार," तिनं आपला निश्चय जाहीर केला.

जेवताना आमच्या गप्पा खूप रंगल्या. सल्माची माहिती तिच्याकडूनच कळली. तिचं कुटुंब मूळ भारतातलं. पण फाळणीच्या वेळी पाकिस्तानात गेलं. तिथून ते कामानिमित्त वेस्ट इंडीजला गेले. तिथे एका कॅनेडिअन तरूणाशी तिची मैत्री जमली. पुढे त्यांनी लग्न केलं आणि सल्मा कॅनडात गेली, कॅनडाची नागरीक बनली. ती आणि तिचा नवरा दोघंही कॅनडाच्या शासनात नोकरी करतात. पण निरनिराळ्या विभागात. ती मुळची मुस्लिम म्हणून त्या सरकारने तिला या देशात एका कार्यक्रमासाठी पाठविलं.

बोलता बोलता योसेनं मुद्द्याची गोष्ट काढली.

"सल्मा!" तो म्हणाला. "इथून आम्ही सोंग-कुळला जाणार आहोत. तिथं खूप थंडी असेल. तुझा तंबू आणि स्लीपिंग बॅग तू प्रकाशला देशील का? त्यानं या गोष्टी आणलेल्या नाहीत!" योसेने माझ्याकडे डोळे मिचकावित म्हटले.

"पण योसा, तू मला याची काहीच कल्पना दिली नाहीस," मी माझा बचाव केला.

"खुशाल घेऊन जा!" सल्मा म्हणाली. "उन्हाळा सुरू झाल्यामुळे मला त्यांची जरूर लागणार नाही; सोंग कुळला जाताना वाटेत नरिन लागते. तिथे माझ्याकडे येऊन घेऊन जा!" ती जायावरून उठत म्हणाली. "आणि

नरिनला माझ्याकडे ठेवा घेऊन मगाशी तुम्ही दोघांनी पुढे जायचं," असं म्हणत ती उठली, काही नोटा तिनं टेबलावरची सरकविल्या आणि आम्हाला बाय बाय करून निघून गेली.

"फार छान, मोकळी मुलगी आहे!" पाठमोऱ्या सल्माकडे पहात योसन उद्गारला. "आपली मोहीम ठरली तेव्हा तिच्याकडे या गोष्टी मागायच्या असं मी ठरवून टाकलं होतं. ती हो म्हणणार याची खात्री होती, म्हणूनच तुला काही कळविलं नाही!" योसनने खुलासा केला.

सल्मा, योसन आणि मी, जगातल्या तीन खंडांतली आम्ही तीन माणसं, इथं एकत्र आलो आणि त्यात आमची मैत्री जमली. कारण इथं फक्त माणूस म्हणून आम्ही एकत्र आलो होतो. आपापल्या देशांत परत गेल्यावरही मैत्री टिकून राहिली असती का? कोण जाणे! कारण मग आम्ही आपल्या समाजाचा एक भाग बनून राहिलो असतो. त्याची अस्मिता, त्याचा देश, धर्म, स्वाभिमान आम्हाला चिकटला असता. त्यांनी आम्हाला एकमेकांपासून दूर ठेवलं असतं. पुन्हा माणूस म्हणून एकत्र येण्यासाठी आम्हाला पुन्हा भेटावं लागलं असतं — किरगिजिस्तानात किंवा जगाच्या पाठीवर कुठेतरी!

# मेरु पर्वताच्या पल्याड

"आपल्याला तिथं पोहोचायचं आहे!" योसा हात उंच करीत म्हणाला. आम्ही पायथ्याशी उभे होतो, एका डोंगराच्या. उंची त्या ठिकाणाची असेल समुद्रसपाटीपासून सुमारे अडीच हजार फूट. योसा दाखवीत होता ती जागा म्हणजे आकाशाला भिडलेली त्या डोंगराची एक कड होती. एखाद्या मुंगीच्या समोर एक कप ठेवला आणि तिला सांगितलं की कप साखरेने भरलेला आहे. पण त्याच्या काठापर्यंत आधी तुला चढून जायला पाहिजे; म्हणजे तिला जसं वाटेल तसं वाटलं मला!

आमच्यासमोर नऊ हजार फूट वर चढत गेलेल्या या डोंगराला काय म्हणावं? भव्य, उत्तुंग, अफाट? पण डोंगर, पर्वत, महासागर यांचं रूप मानवी शब्दांत पकडणं अशक्य असतं. त्यांचा आवाका डोळ्यांना दिसतो, मनाला जाणवतो पण शब्दांना अबोल करतो. त्यांचं रूप जसं शब्दांत पकडता येत नाही, तसं मनानं जाणून घेताही येत नाही. तिथं नेहमीच काही तरी अगम्य, अनाकलनीय, गूढ असं असतं. आताच पहा ना, या नऊ हजार फुटाच्या अंतरात काय दिसेल, या पेक्षा ती उंच कड दिसत होती ना, त्या पलिकडे काय असेल, हीच उत्कंठा मला जास्त लागून राहिली होती. जणू तो डोंगर हसून मला म्हणत होता, "ती कड तू जेव्हा गाठशील, तेव्हा दूरवर तुला आणखी एक कड दिसेल, मग तिच्या पलिकडे काय आहे, हे तुला पहावंसं वाटेल. अगदी अंतराळातून पाहिलंस तरी चहुकडे तुला कडेच दिसेल. या कडा ओलांडणं तुझ्या नजरेला, तुझ्या मनालाही शक्य होणार नाही."

मग जाणवलं की सकाळी विशोक सोडल्यापासून या कडा ओलांडण्याचा आपल्या मनानं कितीवेळा प्रयत्न केला. भल्या पहाटेच आम्ही विशोकहून निघालो. निघताना योसानं सांगितलं की आता आपण हिमनस्थान पर्वताच्या अंतर्भागात शिरणार आहोत. त्यावेळी मला

आठवला पीटर सेम्यॉनोव्ह — गेल्या शतकातला रशियन भूगो-
-लतज्ज्ञ. टिएनशान पर्वताची रहस्यं उकलण्याचा ध्यासच
त्याने घेतला होता. पर्वतभ्रमणाचं जबरदस्त वेड असलेल्या
या माणसानं आधी कित्येक वर्षे आल्प्समध्ये घालवून
सराव केला. व्हेसुवियस हा ज्वालामुखी तो सतरा
वेळा चढून गेला. त्याच्या सर्व बाजू त्याने पालथ्या घातल्या
आणि अनेकदा त्याच्या ज्वलंत विवरात उतरून नमुने
गोळा केले. टिएनशान पर्वत तसा शास्त्राला अज्ञातच
होता. त्याचा भूगोल, त्यातील खडकांची रचना, त्यातील
वनस्पती, कीटक, पक्षी, प्राणी यांची काहीच माहिती
शास्त्रीय जगताला नव्हती. तेव्हा रशियन भूगोल संस्थेला
पाठिंबा मिळविणे सेम्यॉनोव्हला जड गेले नाही. सर्व तयारी
पूर्ण करून १८५६ साली तो सेंट पीटर्सबर्गहून (हल्लीचे
लेनिनग्राड) आल्माआटा येथे आला आणि त्याने टिएन-
-शानची चढाई सुरू केली.

कझाकस्तान - किरगीझीस्तान यांच्या सीमेवरील
पर्वताची पहिली रांग त्याने पार केली आणि एक अवर्ण-
-नीय दृश्य त्याला दिसले. क्षितिजापर्यंत पर्वतांच्या असंख्य (रांगा)
एकामागोमाग एक अशा पसरल्या होत्या आणि असंख्य
हिमशिखरांनी क्षितिज अडविले होते. या पर्वताचा रहस्यभेद
करण्याचा ध्यास घेतलेला हा माणूस या दृश्याने वेडा झाला
आणि नंतरची दोन वर्षे इथेच फिरत राहिला. खडक, वनस्प-
-ती, कीटक यांचे असंख्य नमुने त्याने गोळा केले. त्याचे
सामान एवढे फुगले की एका वेळी त्याच्याबरोबर ५० घोडे-
-स्वार आणि १५०० भारवाहकांचा तांडा होता!

पण आमच्या मोहिमेत सध्या तरी आम्ही
दोघेच होतो आणि तिसरी आमचा भार वाहणारी,
योस्टची लॅन्डरोव्हर. आम्ही सर्व आवश्यक गोष्टी
बरोबर घेतल्या आहेत की नाही, याची योस्ट काळजी
करीत होता, सामानाच्या यादीची उजळणी करीत होता

आणि ड्रायव्हिंग करता करता आपण कुठे आलो आहोत, ते सांगत होता. शहराच्या बाहेर पडून आम्ही दक्षिणेकडचा रस्ता पकडला आणि थोड्याच वेळात मला रशियन लिपीत लिहिलेली पाटी दिसली, "तोकमाक". पुन्हा एकदा माझे मन काळाची कड ओलांडून मागे गेले.

तोकमाकची छोटीशी वस्ती आहे एका विस्तृत खो-र्‍यात. त्याच्या एका बाजूला टिएनशानचे सोपे उतार आहेत, एका बाजूला मोठी मैदाने आहेत, कुरणे आहेत आणि चू नदी आणि तिला मिळणाऱ्या ओढ्यांची पात्रे आहेत. सारा सखल भाग शेतं आणि कुरणं यांनी भरून गेलेला दिसत असला तरी माझ्या मनःचक्षूंपुढे मात्र तिथे गर्दी उडालेली दिसू लागली. भटक्या टोळीवाल्यांचे तंबू दिसले, त्यांनी बरोबर आणलेले ~~[illegible]~~ उंट, घोडे आणि याकचे कळप दिसले आणि पलीकडच्या उतारांवरून सुसाट दौडत येणारे घोडेस्वार दिसले. लौकरच घोड्यांच्या खिंकाळण्याने, उंटांच्या धडधडण्याने आणि याकांच्या हुंदडण्याने आसमंत निनादला, धूळीने ~~[illegible]~~ कोंदून गेला आणि तलवारींनी जखमी झाला. या सैतानी झुंडीतून चेंगिझखानाचा वणवा भडकून पेटताना मी पहात होतो; निम्म्या जगाला हा वणवा हादरून सोडणार होता.

एवढ्यात योसने गाडी थांबविली आहे, हे लक्षात येऊन इतिहासात घोटाळणारे माझे मन जागे झाले. चेंगिझखानाच्या वणव्यात भाजून निघणाऱ्या माझ्या मनावर फुंकर घालणारे दृश्य समोर उलगडले होते. एका निळ्या-शार जलाशयाकाठी लॅन्डरोव्हर उभी होती आणि गाडीतून उतरून रस्त्याकडच्या डोंगरउतारावर योसने दुर्बीण रोखली होती. पण माझं लक्ष गेलं समोरून येणाऱ्या घोड्यांच्या दळाकडे, तो तांडा हाकणाऱ्या, कान झाकणारी, उंच सिरखिजी टोपी घातलेल्या तरुण घोडेस्वार पोरांकडे आणि भूतकाळाशी वर्तमानकाळाचा सांधा जुळला!

हा सुंदर जलाशय पहायला सोडून योस त्या

शुष्क डोंगराकडे काय पाहतोय, असं मनाशी म्हणत मीही दुर्बीण डोळ्यांना लावली. तेवढ्यात त्या डोंगरावरून एक पक्षी उडाला आणि हवेत घिरट्या मारू लागला. "लहान केस्ट्रल" मनानं नोंद केली. एवढ्यात डोंगरामागून आणखी तसाच, किंचित मोठ्या आकाराचा पक्षी आला आणि तिथे उतरला. केस्ट्रलच्या या जोडीने डोंगराच्या कपारीत आपला संसार थाटला होता. इथून हिवाळ्यात स्थलांतर करीत तो भारतातून पूर्व आफ्रिकेत जात असावा. हा ससाणा पाहण्याचे भाग्य भारतातही फार थोड्या लोकांना लाभलेले आहे. सालिम अलींनी ओरिसात या जातीच्या सुमारे २०० ससाण्यांचा थवा पाहिल्याचा अविस्मरणीय अनुभव नोंदविलेला आहे. पुणे आणि सोलापूर जवळही तो दिसल्याची नोंद आहे. मी भारतात त्याला कधी पाहिला नव्हता. त्याचं पहिलं दर्शन घडलं ते असं — त्याच्या जन्मभूमीवर आणि तेही जोडी संसारात मग्न असताना. आजच्या दिवसाची सुरुवात तर उत्तम झाली, मी मनाशी म्हटलं.

घरट्याजवळ या जोडीची ये-जा आम्ही बराच वेळ पहात होतो, पण त्यांनी अंडी घातली आहेत की नाही, हे दिसत नव्हतं. नर किंवा मादी कोणीही घरट्यात फार वेळ थांबताना दिसत नव्हतं. त्यावरून अंडी मादीने अजून घातली नसावीत असा आम्ही अंदाज बांधला.

मी माझं लक्ष मग जलाशयाकडे वळविलं. डोंगरांच्या दोन रांगांमधलं सपाट खोरं या जलाशयानं व्यापलं होतं. बोडक्या डोंगरांमधली जलाशयाची निळाई खरंच डोळे निववत होती. सू नावाच्या नदीवर धरण बांधून हा जलाशय निर्माण केलेला होता. ही सू नदी टिएनशान पर्वताच्या मध्य भागात उगम पावते आणि इतर काही प्रवाहांचं पाणी गोळा करीत उत्तरेकडे कझाकस्तानात वाहत जाते. तिथेही तिच्यावर धरणं बांधून जलाशय तयार

केलेले आहेत, कालव्यातून तिचं पाणी वाळवंटातल्या शे-तांना, कुरणांना पुरविलेलं आहे. त्यामुळे या नदीला मुख्य प्रवाह क्षीण झाला आहे आणि वायव्येकडे वाहत वाहत वाळवं-टात लुप्त झाला आहे. जेथे ही नदी वाळवंटात विलीन होते, तिथे कझाकस्तानमधले दलदलीचे सुप्रसिद्ध भाग आहेत. सुप्रसिद्ध अशासाठी की हरत-हेचे जलपक्षी तिथे मुक्काम करून असतात!

या मानवनिर्मित जलाशयाचे काठ मात्र मोकळे-च होते. ना पक्षी, ना एखादं झाड-झुडुप. कुठे एखादा बगळा, एखादं बदक दिसेल म्हणून आम्ही जलाशयाच्या कडा पुन:पुन्हा तपासल्या. पण कुठे हालचाल दिसेल तर शपथ! मग मी दुर्बीण बाजूच्या डोंगरांवर रोखली, त्यांचे कडकडीत, तासीव उतार पहावेत म्हणून. न जाणो, एखादा गरुड, एखादं गिधाड संथपणे उडताना दिसायचं. पण माझी हालचाल जाणवली डोंगरावरच्या आकाशाच्या तुकड्यात. चार बदकांची एक तुकडी संथपणे हवा कापीत आमच्याच दिशेनं येत होती.

"चक्रवाक!" बदकं नजरेच्या टप्प्यात येताच मी ओरडलो. "बहुधा लांब कुठेतरी चालले असावेत," योगेनं वाक्य पुरे केलं. दक्षिणेकडून उडत आलेले हे पक्षी आमच्या डोक्यावरून उडत उत्तरेकडच्या डोंगरांपाठीमा-गे दिसेनासे झाले.

जून महिन्याला दुसरा आठवडा सुरू होत होता. स्थलांतरीत पक्ष्यांनी भारतातून उत्तरेकडे प्रवासास दोन महिन्यांपूर्वीच सुरुवात केली होती. पुण्याच्या पूर्वेकडील आणि दक्षिणेकडील जलाशयांवर चक्रवाकांचे थवे मी फेब्रुवारी महिन्यात पाहिले होते. मार्चमध्ये त्यांपैकी बहुत-कांनी पुण्याच्या परिसरातून उड्डाण केले. महिनाभरातच त्यांपैकी कित्येक लडाखमध्ये उतरले असावेत. सिंधू नदीला प्रवाह पकडून त्याच्या आधाराने उत्तरेकडे जाताना मी त्यांना

एप्रिल महिन्यात पाहिलं होतं. शेकडो लक्षावधि जोडपी लडाख हिमालयाच्या कडेकपारीत घरटी करतात. पण शेकडो तिथे न थांबता आणखी उत्तरेकडे प्रस्थान ठेवतात. का! असे घरटं करणारा लहान केस्ट्रल भारतात हजारो अनुकूल जागा असताना, सागर ओलांडून आफ्रिकेत जाणं पसंत करतो. का! निसर्गात अशी अनेक कोडी आहेत की जी मानवी शास्त्राला अजून उलगडता येत नाहीत!

योसच्या लॅन्डरोव्हरने आता चार हजार फूट उंचीवरची एक खिंड ओलांडली आणि सू नदीचे खोरे सोडून आम्ही दुसऱ्या एका प्रवाहाच्या खोऱ्यात प्रवेश केला. या प्रवाहाच्या दोन्ही तीरांवर विलोची दाट वने होती. लडाखच्या आठवणी जागृत करणारा आणखी एक पक्षी आता आम्हाला भेटला. तो होता लॉंग शेपूटवाला मॅगपाय — कावळ्याचा या, उत्तरेकडच्या वाळवंटी प्रदेशातला जातभाई. कावळ्यासारखेच रस्त्याकडेला बसलेले हे पक्षी अधूनमधून भेटत राहिले; आणि एक छोटी टेकडी पार करताना भेटला चकोर — कोंबडीहून थोड्या लहान आकाराचा, मुख्यत: जमिनीवरच ~~वा~~ वावरणारा हा पक्षी हिमालयातही नऊ-दहा हजार फूट उंचीच्या आसपास नेहमी आढळतो.

पुढे, एका ठिकाणी, या प्रवाहावर एक पूल होता, तिथे योसने गाडी थांबविली. पुलापलीकडे रस्ता डोंगरात शिरत होता, आणि एकामागून एक टेकड्या पार करीत आम्ही नऊ हजार फूट चढून जाणार होतो.

“दुपारी इथूनच, आपल्याला ~~डोंगरमाथ्या~~ सोंग-कुळकडे जायचंय,” डोंगरमाथ्याकडे बोट दाखवीत योस म्हणाला. “पण आधी नदीला जाऊन तळ्याकडून तुमच्यासाठी तंबू आणि स्लीपिंग बॅग घेऊ. शिवाय सोनमने जेवणाचं आमंत्रण दिलंय

आपल्याला," योसेने आठवण करून दिली.

पूल आणि त्याच्या सभोवतीचं जंगल पाहून आम्ही परत गाडीत बसत असताना एक पक्षी उडत आला आणि डोंगरापर्यंत जाऊन परत फिरला. "चक्रवाक" आम्ही दोघांनीही पुन्हा नोंद केली. "पण ही मादी दिसतीय" मी म्हटलं. "नेहमी जोडीने असतात हे पक्षी," नरपक्षी कुठे गेला?"

त्या चक्रवाकीने उडत उडत त्या प्रवाहाभोवतीच्या जंगलावर तीन-चार घिरट्या मारल्या. जणू ती काही तरी शोधीत होती!

"हिवाळ्यात स्थलांतर करताना बहुधा कोणा-च्या गोळीला बळी पडला असावा किंवा तुफान-वादळात गायब झाला असावा," योसेने अंदाज बांधला. घिरट्या मारणारी ती चक्रवाकी हळूहळू डोंगराकडे उडत दिसेनाशी झाली आणि आम्ही नारिनकडे निघालो.

आता रस्त्याकडेच्या टेकड्यांचं रूप बदललं. सॅन्डस्टोन आणि इतर पाषाणांची जागा आता मातीच्या उंचच्या उंच दरडींनी घेतली. त्यांना मनोऱ्या-सारखे विविध आकार आलेले होते. कोणत्या तरी प्रवाहाने मोठ्या प्रमाणात गाळ आणून इथे पसरला की काय? माझ्या मनात शंका आली आणि पुढे जाताना आम्हाला एका नदीचे दर्शन घडले. ही नारिन नदी. सॉंग कुलच्या उत्तरेकडे टिएनशान पर्वतात उगम पावणारी आणि इतर अनेक प्रवाहांना गोळा करीत मोठी होणारी, किरगिझीस्तानातून उझबेकिस्तानात व तिथून काझाकस्तानात वाहत जाणारी. शेवटी अरल समुद्राला मिळणारी. याच प्रवाहाला पुढे सिरदारिया हे सुप्रसिद्ध नाव प्राप्त होतं. तीन हजार किलोमीटर लांबी असलेली ही मध्य आशियातील सर्वांत मोठी नदी!

ग्रीक योद्धा अलेक्झांडरच्या काळापासून इतिहासप्रसिद्ध असलेली. ही आणि अमुदारिया या मध्य आशियातल्या दोन प्रमुख नद्या. अमुदारिया लांबीने कमी असली तरी तिच्यातून जास्त पाणी वाहते. या दोन्ही नद्या अरल समुद्राला मिळतात. मात्र या दोन्ही नद्यांवर प्रचंड धरणे बांधून त्यांचे पाणी अडविल्याने त्यांचे प्रवाह इतके क्षीण झाले की अरल समुद्राला मिळणाऱ्या पाण्यात प्रचंड घट झाली. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत हा समुद्र एवढा आटला की त्याचे एकचतुर्थांश क्षेत्रफळही आता शिल्लक उरलेले नाही! समुद्र आटल्याने इथली बंदरे ओस पडली, व्यापार संपला आणि मोठ्या प्रमाणावर चाललेला मासेमारीचा व्यवसाय संपुष्टात आला. शहरे, गावे उठली आणि अनेक लोक देशोधडीला लागले. शिवाय अनेक दुर्मिळ वनस्पती, मासे, जलचर, जलपक्षी व प्राणी नष्ट झाले किंवा निघून गेले. एकेकाळी समृद्ध असलेला हा प्रदेश उजाड झाला. आता तिथे गेलात तर जुन्या बंदरांचे, लोकवस्तीचे अवशेष आणि वाळूत रुतलेल्या बोटींचे सांगाडे एवढंच पहायला मिळतं. अरल समुद्राचा मृत्यू ही या शतकातली फार मोठी शोकांतिका ठरली!

सिरदरिया नदीच्या काठाकाठाने पहात पहात मी तिच्याबरोबर अरल समुद्रापर्यंत गेलो आणि परत आलो! इथे अजून नरीनच असलेल्या या नदीचं रूप अवखळ होतं. कधी खडकांना धडका देत तर कधी गाळानं भरलेल्या बेटांना संथपणे वळसे घालीत ती वाहत होती. तिच्या काठी वसलेल्या गावाचं नाव नरिनच होतं. एक छोटा पूल ओलांडून आम्ही नरिनमध्ये प्रवेश केला.

गावात प्रवेश करताना असंख्य थडगी लागली. प्रत्येक थडग्यावर एक छोटासा घुमट होता.

दुरून असं वाटत होतं की गोल [illegible] तुर्की टोप्या घातलेलं सैन्यच उभं आहे! गावात एक रुंद रस्ता होता आणि त्याच्या कडेला लहान दुकानं होती. भाज्या, फळे, ब्रेड आणि क्युमिस विकणारी. क्युमिस हे किर-गिझीस्तानातलं खास पेय, राष्ट्रीय पेय म्हणायला हरकत नाही. आपण जसं पाहुण्यांना "चहा घेणार का", विचारतो तसं इथे "क्युमिस घेणार का", विचारतात. घोड्याच्या दुधापासून ते तयार करतात आणि आंबट-गोड ताकासारखं ते लागतं.

गावात एका घरापाशी योसेने लॅन्डरोव्हर थांब-विली. गाडी थांबताच एक किरगीज लगबगीने बाहेर आला. योसेने रशियनमध्ये त्याला काहीतरी म्हटलं. तो आत गेला आणि घरातून डीझेलचा बुधला घेऊन आला. नारिन गावात पंप नव्हता. डीझेल असं कोणाकडून तरी मिळवावं लागत होतं.

आम्ही प्रथम सल्माच्या ऑफीसवर गेलो. एका आंतरराष्ट्रीय शैक्षणिक प्रकल्पात ती काम करीत होती. ती ऑफीसमध्ये नव्हती. मग तिच्या घरी गेलो. हमरस्त्याला समांतर असे छोटे रस्ते होते. त्यांपैकी एका रस्त्यावरच्या इमारतीत तिचा फ्लॅट होता. आम्ही आलेले पाहताच एका माणसाने झटकन दार उघडले आणि एक चिठ्ठी योसेच्या हातात ठेवली. बहुधा तो माणूस आमची वाटच पहात असावा. योसेने चिठ्ठी उलगडली.

योसे,

प्रकाशासाठी तंबू आणि स्लीपिंग बॅग काढून ठेवली आहे. मी बिश-केकला जातेय. फिटूला अपघात झाल्याची तार आलीय. नक्की काय झालेय ते बिशकेकला एम्बसीत कळेल. कदाचित कॅनडाला जावं लागेल.

पुन्हा भेटू. — सल्मा.

योसेने लिबी मला दाखविली आणि रिक्षात टाकली. आम्ही तंबू आणि स्लीपिंग बॅग उचलली आणि मुकाट्याने घराबाहेर पडलो. बाजारात येऊन ब्रेड, लोणी, फळं असं काहीबाही खरेदी केलं आणि नरिनमधून परत फिरलो.

"ह्या दुकानाजवळ थांबून आपण फोन करू आणि पुढे जाऊ", योसे म्हणाला.

माझ्या डोळ्यांसमोर पुलावर उडणारी ती चड्डवाली आली. "कुठे गेली असेल ती? काय झालं असेल तिला सहनराळा?" मन विचारीत होते.

# मेरु पर्वताच्या पल्याड

हिमालयात केदारनाथ मंदिराच्या परिसरात हिंडताना तो अनुभव मला प्रथम आला. मंदिरामागे केदारनाथ-डोम या हिमशिखराचे प्रचंड उतार आहेत. त्यावरून ठिकठिकाणी हिम ओघळलेले असते. देवळाकडे जाताना असं वाटतं की त्याला लागूनच हे उतार आहेत आणि त्यापाठीमागे गेलं की त्या उतारांवर पाऊल ठेवता येईल. त्यावेळी आमच्याबरोबर सिंहगडचा रहिवासी नारायण पेडर होता. त्याला ते हिम जवळून पाहण्याची एवढी उत्कंठा होती की तो म्हणाला, "तुम्ही देवळात जाऊन या. तोपर्यंत मी ते बर्फ चढून येतो." बिचारा तास-दीड तास चालला, तरी ते उतार जवळ येईनात. शेवटी दमून परत आला.

आता असंच झालं. पूल ओलांडून आम्ही डोंगरांत प्रवेश केला, त्यावेळी असं वाटत होतं की उंच, जिथे डोंगराची कड दिसतेय, तिथे आपण तासा-दीड तासात जाऊन पोहोचूं. पण यासाठी लॅन्डरोव्हर एकेक टेकडी पार करू लागली, तरी ती कड आपली जेथल्या तेथेच. ती जवळ येत नव्हती. पुलाजवळच्या प्रवाहाला मिळण्यासाठी एकेक प्रवाह डोंगरावरून खाली उतरत होता आणि रस्ता कधी त्यांच्या काठाने जात तर कधी त्यांना ओलांडीत वरवर चढत होता. जशी आम्ही उंची गाठीत होतो, तसे बाजूचे दृश्य बदलत होते. ओकांवर पाने गळणाऱ्या विलो वृक्षांची जागा हळूहळू सूचिपर्णी वृक्ष घेत होते. खळाळणाऱ्या पाण्यात स्वतःला झोकून देऊन, खडकांवर आदळण्याची पर्वा न करता, प्रवाहाच्या पोटात शिरून बारीक जलचर पकडणारा डिपर पक्षी कुठे दिसतो का, हे मी शोधीत होतो. पण तो भेटत नव्हता. रस्त्याकडेला एक सुंदर तळे लागले म्हणून योसेनं गाडी थांबविली. गाडी थांबताच तळ्यावर विहरणारे चक्रवाक सरसर पोहत काठापासून दूर गेले. तळ्याभोवती उंच सूचिपर्णी झाडे होती आणि उतारावरून एक छोटासा झरा तळ्यात खळखळत येऊन मिळत होता. गाडीचं एंजिन बंद झाल्यावर प्रथम काय जाणवलं असेल तर तिथली नीरव शांतता. या शांततेनं आमच्या मनात केव्हा प्रवेश केला, हे कळलेही नाही.

पण मनाची विचारशक्ती तीत विरून गेली. डोळे पहात होते. आभाळात संथपणे सरकणारे ढग दिसत होते, वाऱ्याच्या झुळुकीबरोबर हलणारी पानं दिसत होती, सरोवराचे डुचडुचणारे पाणी आणि त्यावरचे तरंग कळत होते, पण नेहमीसारखे विचारतरंग निर्माण करण्यास मेंदू असमर्थ होता. मन निःशब्द झाले. इथे शब्दांना कामच नव्हते. ही मानवी सृष्टी नव्हतीच मुळी. पण तरीही मला परकेपणा वाटत नव्हता. एका निरामय आनंदाने मी ते दृश्य पहात होतो आणि पहात नव्हतोही! योसाही निःशब्द होता. काही मिनिटांनी ही तंद्री भंग पावली. "वंडरफुल!" योसा उद्गारला. "फॅन्टॅस्टिक!" मी दुजोरा दिला. मानवी अस्तित्वानं पुन्हा आमचा कब्जा घेतला आणि आम्ही पुढे निघालो.

असा अनुभव या परिसरात पुनःपुन्हा येणार होता.

"एम्बसीत सलमाला काय बातमी कळतीय कोण जाणे!" गाडी चालविता चालविता योसा म्हणाला. "किले, ही उमदा पोरगा होता. गेल्या वर्षी तो इथे आला होता, तेव्हा आमची भेट झाली होती."

"फार सीरिअस काही झालं नसेलही," मी आशा व्यक्त केली. "परत जाताना तिची पुन्हा भेट होईल, अशी आशा करू या."

"अनातोली आणि अवक्सा बहुधा आपल्या पुढे असतील आणि त्यांनी कॅम्प उभारलेही असेल," योसा विषय बदलीत म्हणाला. किरघीज ॲकॅडमी ऑफ सायन्समध्ये काम करणारे हे दोन पक्षीतज्ज्ञ. आमच्या मोहिमेचे स्थानिक सदस्य. अनातोली युक्रेनिअन तर अवक्सा किरघीज. या शतकाच्या सुरुवातीस जे युक्रेनिअन लोक इथे आले, त्यांत अनातोलीचे आई-वडीलही होते. अनातोलीचा जन्म इथलाच. त्याचं शिक्षण इथे आणि मॉस्कोमध्ये झालं. अवक्सा तर अस्सल किरघीज.

दोघांची चेहरेपट्टी एकदम निराळी. अनातोलीची कॉके-शिअन ठेवण तर अक्साची मंगोलिअन. भाषा आणि वेष सारखाच. पण सूक्ष्मपणे पाहणाऱ्याला त्यातील फरकही कळत होता. अनातोलीची भाषा अस्सल रशियन तर अक्साला किरगिझी "ॲक्सेंट".

आमच्या मोहीमेत किरगीझ ॲकडमीला सामील करून घेण्यात आणि त्यांना पाठिंबा मिळविण्यात येसा यशस्वी झाला होता. "सोव्हिएत युनिअनची शकले झाल्यापासून या शास्त्रज्ञ मंडळींची फार पंचाईत झाली आहे," येसा म्हणाला. "मॉस्को-कडून येणारं अनुदान थांबलं, त्याचबरोबर अद्ययावत माहिती, पुस्तकं, जर्नल्स बंद झाले. परिषदा, परिसंवाद यांना येणारी आमंत्रणंही थांबली. त्यामुळे या मंडळींना जगाशी, एवढंच नव्हे तर शेजारच्या देशांशीही संबंध तुटल्यासारखं झालंय. संशोधनाला, प्रवास करायला, पैसा नाही, वाहनं नाहीत, साधनंही नाहीत. ही मोहीम म्हणजे त्यांना फार दिवसांनी मिळालेली सुवर्णसंधी आहे," येसानं सांगितलं. "मी युरोपिअन कम्युनिटीकडून त्यांच्या खर्चाची व्यवस्था केली," तो पुढे म्हणाला.

भर दुपारी आम्ही डोंगर चढत होतो. पण उंचीमुळे ऊन जाणवत नव्हते. उतार आणखी उंच पोहोचल्यावर थंडी वाजायला लागली, तसे आम्ही कोट चढविले. "अनातोली आणि अक्सा यांनी कॅम्प उभारला असेल तर पोचल्यावर आपल्याला गरम चहा मिळेल," माझ्या मनात स्वार्थी विचार आला.

लवकरच आमच्या सभोवतीची सूचिपर्णी मंडळी नाहीशी झाली आणि आता चहूबाजूला मोकळी, खड-काळ, एका बाजूने उतरत जाणारी मैदाने लागली. अनेक छोटे-मोठे प्रवाह त्यामधून वाहत होते. गवत, आयरिसचे ताटवे आणि ज्युनिपरची करकरीत पाने याशिवाय सर्व खडकाळ खडक होते. मात्र ते खडबडीत,

काळे पत्थर नव्हते. तर पाणी आणि हिम यांनी गुळगुळीत बनविलेले, निब्बर, राखी आणि बदामी रंगाचे गोटे होते. त्यांच्याभोवती पिवळ्या-जांभळ्या फुलांची झालर होती. मला वाटलं, या गुळगुळीत गोट्यांवर लोळावं, आणि त्या फुलांच्या थंडगार स्पर्शाने डोळ्यांचा शीण घालवावा. अगदी तसंच करीत एका खडकावर लोळणाऱ्या कोल्ह्याला आम्ही दचकवि-लं. तो उठला, आमच्याकडे एक क्षण त्यानं बघितलं, आणि धूम ठोकली.

"अंडीचोर!" योसाने शापवाणी उच्चारली. "तू पाह-शील, इथे घरटी करणाऱ्या पक्ष्यांचा मुख्य शत्रू म्हणजे हे कोल्हे," योसाने सांगितलं.

ओलांडून हा खडकाळ, मैदानी प्रदेशही आम्ही मागे टाकला. मग सुरू झाली खडी चढण. योसाला गाडी पहिल्या गिअरमध्ये घालावी लागली. कपाला तीव्र चढ चढून आम्ही त्याच्या काठावर पोहोचणार होतो. आतापर्यंत अप्राप्य वाट-णारी ती उंच कड आता खरोखरच जवळ सरकू लागली. एकामागून एक "हेअरपिन बेण्डस्" मागे टाकताना योसा आणि त्याची गाडी दोघेही घामाघूम झाले. पण शेवटचे वळण त्यामानाने सोपे निघाले. ते झटक्यात घेऊन योसा-ने गाडी त्या कडेवर आणली आणि उभी केली. ११ हजार फूट उंची आम्ही गाठली होती. आमच्यापाठोपाठ एक काळा पक्षी संथपणे, सहजपणे उडत आला आणि सराईतपणे जमिनीवर टेकला. कुतूहलाने आम्ही त्याच्याकडे आणि त्यानं आमच्याकडे पाहिलं. नंतर त्यानं आपली लालभडक चोच खाली वळविली आणि आपल्या उद्योगास — भेगाता-त कीटक शोधण्याला — सुरुवात केली. हा लाल चोचीचा चफ. माणसं पर्वत चढू लागली की हमखास त्यांच्या मागावर येणारा. तेनसिंग आणि हिलरी एव्हरेस्टची शेवटची चढण चढत होते, तेव्हाही हे चिरंजीव त्यांच्या आसपास घोटाळत होते. जणू तिथं माणसं कशाला

अडमडतात, असं कुतूहल त्याला असेल किंवा माणूस तिथं खाद्य, हे अनुमानं तो शिकला असेल आणि कॅम्पच्या अंवतीभंवती लक्ष ठेवून असेल. माणसाला श्वास घेणंही जिथं जड जातं, तिथं, किंवा त्याहूनही अधिक उंचीवर, हे पक्षी सहज उडतात. त्या विरळ हवेतही त्यांचे पंख, त्यांचं शरीर सफाईने पेलू शकतात!

गाडीतून उतरून मी सभोवती नजर टाकली. एका विस्तीर्ण, गवताळ मैदानात आम्ही येऊन पोहोचलो होतो. त्या सपाट, प्रदेशात कोठेही मोठासा उंचवटा नव्हता. मध्यभागाच्या दिशेने या कुरणाला संथ उतार होता. मला खात्री होती की हा उतार मध्यभागी असलेल्या खोलगटीच्या दिशेने असणार, आणि त्या खोलगटीत सोंग कुल सरोवर असणार. आम्ही उभे होतो, तेथून सरोवर दिसत नव्हते. पण कोठे तरी त्याची भिंत फोडून त्यातून निघालेला प्रवाह आमच्या उजव्या बाजूने खळाळत होता. त्याने जमिनीला पाडलेली खोल भेग अस्पष्ट दिसत होती, आणि त्यातून वाहणाऱ्या पाण्याचा आवाज घुमत होता. हा प्रवाह आम्ही चढून आलेला डोंगर उतरून खालच्या प्रवाहाला मिळत होता. तेथून ते दोन्ही प्रवाह पुढे नारिन नदीत विलीन होत होते. या विस्तीर्ण गवताळ प्रदेशाला चहुबाजूंनी डोंगरांनी वेढा घातला होता. पश्चिमेकडे दूरवर त्यांची हिमशिखरे मावळतीच्या उन्हात चमकत होती. आमच्या डाव्या बाजूला, दक्षिणेकडे, एक अजस्त्र पाषाणकडा होता, आणि त्यावर काळ्याकभिन्न फत्तराचे अणकुचीदार शिखर होते. जणू शिरस्त्राण आणि चिलखत चढवून कोणी योद्धा प्रवेशद्वाराशी पहारा देत उभा आहे. मी मनातल्या मनात त्या सुळक्याला नाव देऊन टाकले, "राणा प्रताप शिखर!"

त्या अफाट उघळवटीत आम्ही तिघं, मी, योसा आणि आमची गाडी, फारच चिमुकले वाटत होतो. तो [illegible] सोडला तर आजूबाजूस चिटपाखरूही नव्हते. डोक्यावर अंतराळ

आणि पायोरसाठी नजरेत न मावणारं अंतर. वाटलं,
हे पर्वत, या हिमनद्या, इथला वारा, वादळं, विजा, एका
फुंकरीसरशी आपल्याला उडवून लावतील, पण मन म्हणा-
-लं, प्रतिकूल परिस्थितीशी झुंज घेण्यातच मानवी जीवनाचं
सार्थक आहे. निसर्ग असा भयप्रद नसता, तर मानव
जन्माला आलाच नसता!

मी योसाकडे प्रश्नार्थक नजर टाकली. योसाने
"पुढे निघू या," अशा अर्थाची खूण केली. पुढे रस्ता
असा नव्हताच. एक मळलेली वाट होती. उन्हाळ्यात इथे
चरण्यासाठी येणाऱ्या घोड्यांच्या तांड्यांनी ती पाडलेली
असणार. योसाने या पायवाटेवरच गाडी घातली. वाटेत
ओढा लागला तर त्यावर चक्क पूल होता. पुलाच्या दोन्ही
बाजूला कच्चा रस्ता होता. याचा अर्थ इथे एके काळी
कच्चा का होईना, रस्ता असणार. आता कदाचित इतक्या
दुर्गम भागातले रस्ते बांधून ठेवण्यासाठी पैसा नसेल म्हणून
पुष्कळशा रस्त्यांची वासलात लागली असणार.

आम्ही पुढे जात होतो, तसतशी उत्तरेकडे
सरोवराची निळी कड दिसू लागली. तिच्या आसपास
कुठे तंबू दिसतात का, हे पाहण्यास योसाने मला सांगि-
-तले होते. पण ते काही नजरेत अजून येत नव्हते. पंधरा-
-वीस किलोमीटर अंतर काटल्यावर योसाने वाट सोडून
गाडी सरळ कुरणातच घातली. गवतात न दिसणारे
खाचखळगे ओलांडीत आम्ही सरोवराच्या दिशेने पुढे
निघालो. वाटेत दोन-तीन ओढ्यांची वाळूने भरलेली
कोरडी पात्रे आम्ही पार केली. पण अर्धा तास कुरणात
गाडी पळवूनही कॅम्प सापडेना. आमच्या पुढे गेलेल्या
एखाद्या गाडीच्या खुणा, टायरने चेपलेले गवत, हे सुद्धा
आढळत नव्हते. मग गाडी थांबवून योसाने नकाशा उलगडला.

"इथेच कुठेतरी कॅम्प असायला पाहिजे होता,"
नकाशावर बोट ठेवीत योसा म्हणाला. "आपण वाट

चुकलेलो नाही, अनातोली आणि अल्सा यांना निघायला उशीर झाला असणार.”

“कदाचित थोड्याच वेळात ते येऊन पोहोचतीलही,” मी आशा व्यक्त केली.

पण आता शोधाशोध करण्यात वेळ घालविणं योग्य नव्हतं. लवकरच अंधार पडला असता. त्याआधी तंबू उभे करणं आवश्यक होतं. एका कोरड्या ओढ्याका-ठची जागा आम्ही निवडली. स्कूमाच्या “अमेरिकन” तंबूची घडण मला नवीन होती. ती कशी उभारायची हे योसानं मला समजावून सांगितलं. योसाचा तंबू प्रशस्त होता. त्यात दोन “खोल्या” होत्या. बाहेरची सामान ठेवायला आणि आतली “बेडरूम”. त्या मानाने माझा चिमुकला होता. पण माझ्याकडे सामानही फार नव्हते. थोड्याच वेळात त्या अफाट निसर्गात दोन मानवी वस्त्यांचे अस्तित्व जाणवू लागले — अर्थात आमचे तंबू.

मग आम्ही पिण्याचं पाणी शोधण्यासाठी निघा-लो. सरोवराचं पाणी पिण्यापेक्षा डोंगरातल्या झऱ्याचं पाणी आणणं अधिक श्रेयस्कर होतं. गाडी परत वाटेवर आणून योसाने ती आता दक्षिणेकडच्या डोंगरांच्या दिशेने फुरणात घातली. बर्फ वितळून वाहत येणारे प्रवाह जागो-जागी होते. त्यांपैकी आम्ही एक निवडला. जवळपास कोणी तळ टाकल्याची खूण नव्हती. मग योसाने गाडीतून एक निशाण काढले आणि ते जमिनीत रोवून पक्के उभे केले, खूण म्हणून. पुन्हा इथं यायचं तर शोधाशोध करावी लागू नये म्हणून. मग दोन झाकणाच्या बादल्या भरून आम्ही गाडीत ठेवल्या आणि परत फिरलो.

पाणी आणलं तरी जेवण तयार करण्याची सामग्री आमच्याकडे कुठे होती. ती होती अनातोली आणि अल्सा यांच्या गाडीत. ते पोहोचेपर्यंत दुसरं काही करणं शक्य नव्हतं. मी सहज पूर्वेकडे नजर टाकली. राणा प्रताप शिखरामागे

काळे ढग जमा होत होते. पण शिखरावर सूर्यकिरण पड-
-ल्यामुळे त्या काळ्या पार्श्वभूमीवर राणा प्रताप विलक्षण
तेजाने झळाळत होते. एवढ्यात वीज चमकली आणि
शिखराला कंगोरान् कंगोरा उजळून निघाला. जणू तो
महान् योद्धा वादळाला तोंड देण्यास सज्ज होत होता!
क्षणोक्षणी जवळ सरकणारे वादळ आम्ही डोळे विस्फा-
-रून पहात होतो. दुसऱ्या क्षणी वाऱ्याचा झोत दणाणत आला
आणि त्याने आमचे तंबू फुगविले, वर उचलले. आम्ही
त्यांना सावरण्यासाठी झटकन् आत शिरलो.

इथल्या वादळाला तोंड देऊ शकेल का हा
कुठलासा तंबू? मला काहीच कल्पना करता येत नव्हती.
दोन बाकदार वेताच्या लवचिक काड्यांवर तो तोललेला
होता. वाऱ्याने ताणल्या जाऊन त्या काड्या मोडल्या तर?
मी त्यांना हाताचे आधार देण्याचा प्रयत्न करू लागलो.
एवढ्यात वाऱ्याचा दुसरा झोत आला आणि त्याचे तंबू
गदगदला. पाठोपाठ पावसाचा फवारा फरारत आला
आणि त्याने तंबूवर ताशे वाजविले. मग सामसूम. विजेचे
आभाळ पेटल्यासारखे. मी कानोसा घेतोय. पण गडग-
डाट नाही. आता पुन्हा वादळाची लाट केव्हा फुटणार?
ती मोठी असेल की छोटी? दूर पर्वत घुमू लागल्यासार-
-खा आवाज आणि पाठोपाठ सरसरत येणारे वादळ.
ठिकठिकाणी तंबूला धरून ठेवण्याचा, आधार देण्याचा
माझा प्रयत्न. तंबूभोवती वाऱ्याचा भोवरा. त्यातूनच रेड-
-शँक पक्ष्याची साद कानांवर येतीय. आर्त, करुण!
घटत चाललेल्या काळोखाचं सावट आणखीनच काळं
करणारी. अशा वादळात काय होत असेल या पक्ष्यांचं,
त्यांच्या घरट्यांचं, त्यांच्या अंड्यांचं, पिल्लांचं? भारतात
चांगला उष्ण, सुगंधित पाऊस अंगावर घेण्याऐवजी
या थंडीत कशाला अडमडतात हे पक्षी? पुन्हा बाहेर
विजेचा भडका आणि पाठोपाठ आसूड ओढावा तसा

कडकडाट. रेडशॅकनाही आवाज नाही, पण मला
उगीचच घरची आठवण येतीय. वाऱ्याला वेग
वाढतोय. पुन्हा मोठा झोत येणार? पण नाही, तो
सारा आसमंतच हलवू पाहतोय. तंबूची गदगद
सुरू आहे, ती थांबण्याची चिन्हंच नाहीत. पुन्हा
विजेची मशाल पेटलीय. तंबूची मागील बाजू
लकाकतीय. मी माझीच सावली पाहतोय. पावसाची
फरफर कानांवर येतीय. मी कानोसा घेतोय. तंबू-
-वर पडणारा प्रकाश प्रखर होतोय. अरे! ही वीज
नाही. एकमात्र बोरसन हाक येतीय, "योसा!"

हे नक्की अवकसा आणि अनातोली असणार!
त्यांच्याच जीपचा हा हेडलाइट. बिचारे भिजून आले
असणार, थंडीत कुडकुडत असणार. त्यांच्यासाठी चहाची
तयारी केली पाहिजे. तंबूची झडप उघडताना माझ्या
मनातले हे भावडे विचार आणि बाहेर येणाऱ्या आवाजा-
-चा गडगडाट, हंशा आणि हाकलाक! कॅम्प आता कसा
भरल्यासारखा वाटतोय.

मेरु पर्वताच्या पल्याड

गेले चार दिवस आमचं वास्तव्य पक्षीग्रामात आहे, असं म्हणायला हरकत नाही. पक्ष्यांचं हे गाव सुरेखं आहे, तरंगतं आहे, पुष्कळसं पाण्यात वसलाय. पण इथेही रस्ते आहेत, पादचारी मार्ग आहेत, गल्लीबोळ आहेत, गजबज आहे, रहदारी आहे, मैत्री आहे, भांडणं-हेवेदावे आहेत, आणि प्रसंगी एकजूटही आहे. या शहराचा मध्यवर्ती भाग म्हणजे तीन तरंगती बेटं. त्यांचं एकूण क्षेत्रफळ मोजलं तर ते जेमतेम पाचशे चौरस मीटर भरेल. म्हणून इथे वस्ती दाट आहे, गजबजाट आहे, रहदारीची कोंडी आहे. इथे श्रीमंतांचे महाल आहेत, गरीबांच्या झोपड्या आहेत. दादागिरी-गुंडगिरी आहे, संसार आहेत, सुख-दुःखं आहेत, जिवंतपणाची सगळी लक्षणं इथं आहेत.

या गावाच्या सीमा खूप पसरट आहेत. कुठं त्या पाणी सोडून जमिनीला भिडल्या आहेत, तर कुठं जमिनीच्या पुढे काठाच्या उंचवट्यावर चढल्या आहेत. क्रीडांगणं, मैदानं, उद्यानं, निवांत कोनकोपरे, मोकळ्या जागा, ही सुद्धा या गावाची अविभाज्य अंगं आहेत. त्या बाजूला वस्ती विरळ आहे, घरं दूरदूर आहेत. इथं एकांताची आवड आहे, झगड्याची कटकट नाहीय.

आमचा पहिला दिवस गावाची नीट ओळख करून घेण्यातच गेला. गावात शिरायचं म्हणजे नुसते दोन पाय असून भागणार नव्हतं. दोन पंखही हवे होते. ते कुठं होते आमच्याजवळ? पण गावात शिरायला दुसरा मार्ग होता पाण्यातला. अवसा आणि अनातोली कदाचित पोहूनही या मार्गाने गेले असते. पण [illegible] आणि विशेषतः उष्ण कटिबंधाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या मला, त्या बर्फाळ पाण्यात हात घालणंही जमलं नसतं. मग पोहण्याची गोष्ट दूरच. पण अवसा आणि अनातोली यांनी धोरणीपणाने दोन रबरी तराफे बरोबर आणले होते. ते फुगवायला पायपंप होता, म्हणून बरं! नाहीतर त्या विरळ

वातावरणात ते फुगवताना आमच्या छाती फुलायची वेळ आली असती. तराफ्यात बसायचं म्हणजेही गुडघाभर पाण्यात उतरणं आवश्यक होतं. पण इथंही या जोडीला ओरणीपणानं कामी आला. जवळपास कमरेपर्यंत पोहोचणारे लांब, खरी "गमबूट" घालूनच आम्ही तराफ्यात बसलो — मी आणि अनातोली आणि येस्का आणि अकसा. आमचा तराफा हिरवा तर त्यांचा तांबडा.

तराफ्यात बसून, सानकारा वल्हवीत आम्ही गावात पोहोचलो. सगळ्यांचं लक्ष अर्थातच आमच्या होडक्यांकडे होतं. आमचं स्वागत जरी झालं नाही, तरी कोणी फार दचकलं नाही, किंवा आम्हाला टाळण्याचा खास प्रयत्न झाल्याचंही दिसलं नाही. जेव्हा आम्ही तराफ्यातून उतरून बेटावर पाय ठेवला, तेव्हा मात्र काही अदबीने बाजूला झाले, काही दूर सरकले तर इतर हवेत उड्डाण करून आम्ही काय करतोय यावर आकाशातून नजर ठेवू लागले.

हे तरंगतं बेट म्हणजे पोर्ट मोजिटोन वगैरे पाणवनस्पतींचा ढिगारा होता. वाऱ्या-वादळाने त्या वनस्पतींना एकत्र आणलं आणि तळातून खेचून वर आणलं. दरवर्षी त्यात भर पडत गेली आणि त्यांचा जाडजूड तराफा तयार झाला. कुठे त्यानं दलदलीत नांगर टाकला होता, तर कुठे तो सुटा तरंगत होता. याशिवाय तळ्यातली दोन नैसर्गिक बेटंही या गावाचा भाग होती. एखाद्या मोठ्या जहाजाला असतात, तशी या बेटांनाही निरनिराळी "डेक्स" होती. प्रत्येक डेक निरनिराळ्या जातीच्या पक्ष्यांनी व्यापलं होतं. तळं, आकाराने सर्वांत मोठं डेक गल पक्ष्यांच्या घरट्यांनी व्यापलं होतं. यांची घरटी म्हणजे अस्ताव्यस्त पसरलेल्या झोपड्या होत्या. त्यांची दाटी अशी होती की दोन घरट्यांमध्ये पाऊल ठेवायला जेमतेम जागा होती. काही घरट्यांत अंड्यांतून पिलं बाहेरही पडली होती, आणि

आम्हाला पाहताच दलदलीतल्या उंच गवतात लपू बघत होती. त्यांचे आई-वडिल आता कर्कश्श आवाज करीत आमच्या डोक्यावर घोंघावत होते. त्याहून वरच्या, दुसऱ्या टेकावर होती टर्न पक्षी आणि काही बदकांची घरटीं. टर्न पक्ष्यांनी घरटं बांधण्यास फार परिश्रम घेतलेले दिसत नव्हते. काही छोटे दगड, पानं, पिसं एवढंच. त्यामानाने बदकांची घरटीं नीरस होती. मध्यभागी गोलाकार खोल बसकण होती, तिला गवत-पिसांचं अस्तर होतं. टर्न पक्षीही चीत्कार करत आपला निषेध नोंदवीत होते. बदके मात्र मूकपणे पोहत सरोवरात दूर गेली आणि तिथून आमच्यावर नजर ठेवून होती. अगदी वरच्या, तिसऱ्या, लहानशा टेकावर राजहंसांची घरटी होती. त्यांची बांधणी पसरट होती, त्यांच्यामध्ये भरपूर अंतर होते. श्रीमंतांच्या घराला भरपूर आवार असावे, तसे. आम्हाला पाहून राजहंसही पाण्यात उतरले, आणि पोहत दूर गेले. त्यांच्यापैकी एकजण मात्र रेंगाळून घिरट्या मारीत आमच्यावर लक्ष ठेवून होता.

पक्ष्यांना त्यांच्या घरट्यांपासून फार वेळ दूर ठेवणं ठीक नव्हतं. तेव्हा आम्ही झटकन घरटी व त्यांच्यातील अंडी यांच्या संख्येचा अंदाज घेतला आणि परत फिरलो.

पक्ष्यांचं हे गाव तसं म्हटलं तर तात्पुरत्या स्व-रूपाचं होतं. आपण नाही उन्हाळ्याच्या सुटीत थंड हवेच्या ठिकाणी जात. पण आपण जातो, मजा करायला. नेहमीची कामं, नेहमीच्या जबाबदाऱ्या क्षणभर विसरून जायला. पक्षी मात्र इथे आले होते, त्यांच्या आयुष्यातली सर्वांत मोठी जबाबदारी पार पाडायला. ही चैन नव्हती, कर्तव्य होतं आणि जो तो आपापल्या स्वभावानुसार, कुवतीनुसार ते पार पाडणार होता. बदकांचंच पहा ना, मादीनं एकदा अंडी घातली आणि झटून ती उबवायला

बसली की मग बदल जबाबदारीतून मोकळा होणार होता, आपल्या सोबत्यांत मिसळणार होता, नवीन प्रणयाची, नव्या वासनापूर्तीची स्वप्नं पाहणार होता, पक्षिणी हरण करण्यासाठी उतावीळ होणार होता. आधुनिक मानवी जगातल्या नराशी असलेलं त्याचं साम्य आश्चर्यचकित करणारं होतं. त्यामानानं झोपडपट्टीतल्या गरुड पक्ष्यांचं जग स्वच्छ, सरळ, रोखठोक होतं. संसाराची निम्मी जबाबदारी उचलायला नराची ना नव्हती. पण इथे सरळ सरळ बळी तो कान पिळी ही परिस्थिती होती. गुंड, रानदांडगे, त्यांना वाटेल ते करण्याला अधिकार इतरांनी मान्य केला होता. झोपडपट्टीतल्या दादांसारखा. त्यांची सत्ता मोठी, तशी कुटुंबंही महान! बाकीचे ~~मा~~ मग दुबळे हेवेदावे, भांडणं, किरकोळ चोचा यांवर समाधान मानणार होते. पण परका शत्रू आला तर एकजुटीनं त्याला तोंड देणार होते. राजहंस त्यामानानं मागासलेले होते. मादीनं अंडी घालून ती उबविणं आणि नरानं तिचं संरक्षण करणं अशी श्रमविभागणी त्यांच्यात होती. अंड्यांतून पिलं बाहेर पडली की त्यांना वाढविणं, शिक्षण देणं, हिवाळ्यातील घराला म्हणजे स्थलांतराला मार्ग दाखविणं ही सर्व जबाबदारी ती दोघं मिळून पार पाडणार होती. पिलं मोठी होऊन आपापल्या मार्गाला लागली की त्यांना फुरसत मिळणार होती. पण तोपर्यंत नवीन घरटं करण्याची वेळ येणार होती. नेकीनं संसार करणं हेच जणू निसर्गानं त्यांना नेमून दिलेलं काम होतं.

इथल्या पक्षीजगताचं मानवी जगाशी जुळणारं साम्य असं विलक्षण होतं. म्हणूनच मला हे जग जवळून पाहण्याची उत्कंठा होती. यामुळे माझी बौद्धिक भूक भागणार होती, पण आपण कोणीतरी देवानं खास घडविलेले, ~~उच्च~~ श्रेणीतले प्राणी आहोत, अशी सतत

घमेंड बाळगणाऱ्या माझ्या मानवी मनाला, या निरीक्ष-णातून आपल्या अहंकाराची पूर्ती होईल, असं काहीतरी सापडेल, असंही जाणवत होतं.

तरीपण मिळालेल्या वेळाबरोबर कोणी कोठून पक्ष्यांचं निरीक्षण करायचं हे आम्ही ठरवून टाकलं आणि दुपारी त्या त्या जागी जाऊन तळ्यातल्या वनस्पतींच्या छोटा आडोसा तयार करून आमच्या हालचालींनी पक्षी फार दचकणार नाहीत एवढी व्यवस्था आम्ही केली. दुर्बीण आणि टेलिस्कोप घेऊन जो तो आपल्या जागी लवकरच स्थानापन्न झाला.

तळ्याच्या काठी एक छोटा उंचवटा आणि त्या-भोवती उंच पाणगवत एवढा आडोसा घेऊन मी माझा टेलिस्कोप उभा केला. माझ्यापासून दोन-अडीचशे मीटर-वर असाच एक आडोसा पकडून योसेफ बसला होता. आम्ही एकमेकांना आपापल्या जागांवरून दिसत नव्हतो. प्रत्येकाच्या टप्प्यात येणारा तळ्यातील वेगळा भागही निराळा होता. दोघांच्या निरीक्षणाची गल्लत होऊ नये म्हणून ही सोय होती. अस्लम आणि अनातोली मात्र आमच्यापासून बरेच दूर होते. पक्षीग्रामाच्या सरहद्दी-वरील बदकं आणि दाबचिकसारखे इतर काही पक्षी यांच्या घरट्यांचे निरीक्षण ते करणार होते.

माझ्या जागेवरून मला राजहंसांची तीन घरटी आणि चौथ्याचे टोक तेवढे दिसत होते. त्याखालची टर्न व बदकांची घरटी आणि गल्ल पक्ष्यांच्या वसाहतीचा काही भागही माझ्या दृष्टिपथात होता. बहुतेक घरट्यां-वर पक्षी बसून होते. म्हणजे अंडी उबवण्याचे काम सुरू झाले होते. गल्ल पक्ष्यांच्या वसाहतीत मात्र वर्दळ होती. घरट्यातून बाहेर पडण्याचा काही पिलं प्रयत्न करीत होती, त्यांना त्यांचे आईबाप आवरीत होते. दुसऱ्याचे पिल्लू आपल्या घरट्यात येऊ लागलं तर

त्यांना हाकलण्यास घरट्याचा मालक किंवा मालकीण सज्ज होते. काही मध्ये पाण्यात उतरत होते, काही हसत चकरा मारीत होते, ओरडत होते, भांडत होते. बदक आणि राजहंसांच्या वसाहतीच्या मानाने इथे विलक्षण ये-जा होती, पंखांची उघडझाप होती, शब्द होते.

माझ्या समोरच्या घरट्यावर बसलेल्या हंसीने मान तिरकी करून एका डोळ्याने आकाशात पाहिले म्हणून मीही नजर वर फेकली तर पंचवीस-तीस राज-हंसांचा एक थवा आकाशात उगवला होता आणि संथपणे विहरत खाली उतरण्यास योग्य अशी जागा शोधीत होता. राजहंसांच्या एवढ्या मोठ्या थव्याचं आगमन मला पूर्ण अनपेक्षित होतं. कोठून आले असतील हे पक्षी? इथे येऊन हे घरटी करू पाहणार? पण योग्य अशी जागा शिल्लक आहे कोठे? इथल्या बेटांवर तर जागाच नाही, आणि सरोवरात दुसरीकडे कुठे अशी बेटंच नाहीत, असं अक्सा आणि अनातोली म्हणत होते. मग काय करतील हे नवीन राजहंस?

राजहंसांच्या या थव्याला पाहून घरट्याभोवती पहारा देणारे नरपक्षी सरकन पाण्यात उतरले, एकत्र गोळा झाले आणि माना ताठ करून त्यांनी साद घातली, "ऑरन ऑरन". त्याबरोबर आकाशात गोल घिरट्या घेणाऱ्या हंसांनी आपले पाय खाली सोडले आणि सावकाश खाली येत एकेकजण हलकेच पाण्या-वर पाय टेकवीत उतरू लागला. हंसांची गती पाण्या-ला मिळाली आणि सरोवराचा पृष्ठभाग दोलायमान झाला. पाण्यावर आधी गोळा झालेले नर आपल्या माना लांबवून, पाण्याला समांतर ठेवून विलक्षण आवेशाने या नवीन थव्यावर चालून गेले. पण थव्यातल्या कोणीच त्यांचे आव्हान स्वीकारले नाही. त्यांनी माना लांब केल्या, चारकोनात फिरविल्या, आळ-

मानांच्या नजरेस नजर भिडविण्याचे टाळले आणि
आम्ही तुमच्याशी भांडू इच्छित नाही, असे जणू
जाहीर करून टाकले. घरट्यांवर बसलेल्या माद्यांची
प्रतिक्रिया काय होते, हे मी उत्सुकतेने पहात होतो. आतापर्यंत
पिसांत मान खुपसून शांतपणे अंडी उबविणाऱ्या माद्याही
आता माना उंच करून सरोवरातल्या हालचाली निरखीत
होत्या. त्या तिघींनाही मी आता व्यवस्थित पाहू शकत होतो.
त्यांची ओळख करून घेण्यास ही नामी संधी होती.

त्या तिघींच्या शरीराची घडण सारखीच होती.
पण त्यांच्या मानेवरचा रुंद काळा पट्टा आणि डोळ्या-
रच्या -वरचे दोन समांतर काळ्या रेषा यांच्या रंगात मला
सूक्ष्म फरक जाणवला. या दोन्ही गोष्टी गडद काळ्या
रंगाच्या असणारी मादी त्यांच्यात सर्वांत वडील असावी.
तिला मी नाव देऊन टाकले श्यामा. दुसऱ्या मादीच्या
मानेवरील आणि डोळ्यावरील पट्ट्यांत भुरकट तपकिरी रंगा-
-ची छटा जास्त होती. तिची पाठीवरची आणि शेपटा-
-जवळील पिसंही भुरकट होती. ही मादी सर्वांत तरुण असावी.
तिला मी नाव दिलं सुरेखा आणि तिसऱ्या मादीचे चमक-
-दार डोळे मला फार आवडले. तिच्या नजरेत एक विलक्षण
तजेला आणि हास्य मला जाणवलं. तिचे मी नाव
ठेवले नयना. नयनाचं घरटं माझ्या बरोबर समोर
होतं. त्यामुळे टेलिस्कोपमधून तिचे डोळे माझ्या जवळ-
-रून पूर्ण ओळखीचे झाले. तिच्या डावीकडचं घरटं
होतं श्यामाचं आणि उजव्या बाजूला, बेटाच्या एका कड-
-वर ~~स~~ सुरेखाचं घरटं होतं.

एव्हाना सरोवरावर शांतता निर्माण झाली होती.
नवीन आलेल्या थव्यातील पक्षी सरोवरावर हिंडण्यात,
माना पाण्यात खुपसून, शेपट्या वर करून भक्ष्य शोध-
ण्यात गुंग झाले होते. त्यांना आव्हान द्यायला गेलेले
बहाद्दर घरट्याकडे परतले आणि घरट्याजवळ उभं राहून

चोची आकाशाकडे फेकत त्यांनी पुन्हा हास्य केलं,
"ऑरख ऑरख! घरट्यावर बसलेल्या तिर्यांनीही माना
जमिनीला समांतर करून त्यांचं स्वागत केलं.

मला लडाखची आठवण झाली. १९८० साली लडा-
-खच्या एका दूरच्या कोपऱ्यात, जिथं लडाख आणि
झास्कर पर्वतांच्या रांगा मिळतात, तिथं पंधरा हजार
फूट उंचीवर असलेलं एक सरोवर मला दिसलं होतं. सरो-
-वरात मध्यभागी एक बेट होतं आणि त्यावर राजहंसांची
वसाहत होती. राजहंसांची भारतातली सर्वांत मोठी ती
वसाहत होती, असं म्हणायला हरकत नव्हती. बेटावर
सुमारे २०० राजहंस होते. पण घरटी फक्त ४१ होती.
म्हणजे केवळ ४१ जोडपीच संसार करण्यास समर्थ
होती. आणि बाकीची? इथे त्यांच्यासाठी जागा भरपूर
होती. पण तरीही त्यांनी घरटं केलं नव्हतं. का? त्यांच्या
जोड्या अजून जमल्याच नव्हत्या? का त्या निष्पर्ण, वाळ-
-वंटी प्रदेशात त्यांना खायची भ्रांत होती? पण मग अशा
ठिकाणी वसाहत करण्याची काय जरूर होती?

इथे सोंग-कुल सरोवराभोवती वनस्पतींची रेल-
-चेल होती. अन्नाचा सुकाळ होता. पण घरटी बांधण्यास
फारशी जागाच नव्हती. तरीही राजहंस एवढ्या संख्येने
इथे उपस्थित झाले. हंसांची जगातली कोणतीही इतर
जात अशा खडतर प्रदेशात घरटी करून पहात नाही.
उन्हाळ्यात सगळे आणखी कितीतरी उत्तरेकडे आर्क्टि-
-क समुद्राजवळच्या टुंड्रा प्रदेशात जमतात. तिथे
जागा आणि अन्न यांना उन्हाळ्यात तरी तोटा नसतो.
तिथे ते घरटी बांधतात, हजारोंनी पिलं वाढवितात.
लाखांच्या संख्येत स्थलांतर करतात. एकट्या राजहंसां-
-नाच निसर्गाने शिकविलंय अशा खडतर मुलुखात
संसार करायला? का शाप दिलाय त्यांची संख्या
कधीच हजार आणि लाखाच्या घरात जाणार नाही असा?

गगनाला गवसणी घालण्याचं सामर्थ्य फक्त राजहंसांच्या पंखांतच आहे. तीस हजार फूट उंचीवरून ते सहज उड्डाण करू शकतात. अशा खडतर मुक्कामात संसाराची जबाबदारी ते पार पाडतात, म्हणूनच हे वरदान निसर्गाने त्यांना दिलं असावं.

माझ्या विचारांची ही साखळी अचानक तुटली कारण गल्ल पक्ष्यांच्या झोपडपट्टीत मोठा कोलाहल माजल्याचा आवाज कानांवर आला. मी पाहिलं तर दोन प्रचंड आकाराचे राक्षसी गल्ल तिथे उतरले होते. त्यांचा रंग पांढरा होता, पण डोकी बुरखे चढविल्यासारखी काळी होती. चोची पिवळ्या होत्या आणि त्यावर लाल ठिपका होता. जणू रक्तपिपासू असल्यासारखा. हे दोन राक्षस अचानक उतरल्यामुळे वसाहतीतल्या लहानग्या गल्ल पक्ष्यांत गोंधळ माजला होता. राक्षस दिमाखाने इकडेतिकडे फिरत होते, वाटेल ती घरटी तुडवीत होते. आकाशातून त्यांच्यावर झेपावणाऱ्यांना भीक घालीत नव्हते. एवढ्यात त्यांना हवं होतं ते सापडलं. प्रत्येकानं एकेका पिल्लाला घास आपल्या रक्तपिपासू चोचीत उचलला आणि हवेत झेप घेतली. सरसरा चढत ते उंच गेले, त्यांच्या पाठलागावर गेलेल्या गल्लना त्यांनी केव्हाच मागे टाकलं. बिचारे आरडाओरडा करीत हताश परतले. पण एवढ्यावरच हे नाट्य संपणार नव्हते. थोड्याच वेळात ते राक्षस पुन्हा परतले. यावेळी शिकार साधायला त्यांना जरासुद्धा वेळ लागला नाही. आपलं भक्ष्य चोचीत धरून सफाईने ते दिसेनासे झाले. झोपडपट्टीतला कोलाहल त्यानंतर कितीतरी वेळ चालू होता.

या दोन राक्षसी हल्ल्यांमुळे सरोवरात एकूणच गोंधळाची स्थिती निर्माण झाली. या राक्षसांपासून राजहंसांना जरी भय नव्हते, तरी त्यांना धसकाच एवढा जबरदस्त होता की राजहंसांना अशा सरोवरात दूरदूर

पांगला. या गोंधळातही घरट्यात बसलेल्या तिन्ही हंसी निश्चल राहिल्या. पण पहारा देणारे त्यांचे सहचर पाण्यात उतरले आणि इतर हंसांबरोबर दूरवर पांगले.

निसर्गालाही आता जणू चेव चढला. जोराचे वारे शिट्या मारू लागले. राणा प्रताप शिखरामागून काळ्या ढगांचे मोहोळ उठले, विजा चमकल्या आणि पाठोपाठ गारांचा मारा सुरू झाला. सरोवरात लाटा उठल्या, पाणी ढवळले गेले, शेवाळे, वनस्पती उखडून वर आल्या आणि या कल्लोळात बदके आणि त्यावरचे पक्षी जणू दिसेनासे झाले. माझीही तारांबळ उडाली. टेलिस्कोप, दुर्बिणीमध्ये पाणी शिरू नये म्हणून मी त्यावर भराभर आवरणे चढविली, रेनकोट ओढल्यावर पांघरूण वादळा--पासून स्वतःचा बचाव मी करू लागलो.

सुमारे अर्ध्या तासात ते वादळ शमले आणि आकाश निवळू लागले. त्याबरोबर वातावरणात थंडी वाढू लागली. मी हातमोजे चढविले आणि थंडीने कुडकुड--णाऱ्या शरीराला सावरीत दुर्बिण डोळ्याला लावली. इतस्ततः विखुरलेले राजहंस घरट्यांच्या दिशेने पुन्हा एकत्रित होत होते. एकेकजण परतत होता. थोड्याच वेळात घरट्याकडे परत येणारे हंस मी पाहिले. तिघेजण सपासप चालून घरट्याजवळ आले आणि आकाशाकडे चोची वळ--वून त्यांनी आवाज केला, "ऑरस ऑरस!"

पण सुरेखाच्या घरट्याजवळ आता एक नव्हे दोन हंस उभे होते. एक नेहमीप्रमाणे घरट्याच्या अगदी जवळ आणि दुसरा थोड्या अंतरावर. सुरेखा मान उंचा--वून पहात होती. तिच्या नजरेत आश्चर्य होते की कुतूहल?

मी जाणून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हतो. थंडीचा कडाका वाढत चालला होता. मी मुकाट्याने सामान उचलले आणि कॅम्पकडे परत फिरलो.

मी कॅम्पवर पोचतो न पोचतो तोच योसाही तिथे येऊन दाखल झाला. त्याचा चेहरा अतिशय आनंदी, उत्साही दिसत होता.

"प्रकाश, मी आज काही विलक्षण गोष्टी पाहिल्या!" तो उद्गारला. "माझ्यासमोर राजहंसांची दोन घरटी होती. बराच वेळ दोन माद्या आपापल्या घरट्यात अंडी उबवीत बसल्या होत्या. दोन्ही नरांचा पत्ता नव्हता. मग काही वेळाने त्यांपैकी एक नर उगवला. तो आल्यावर अर्थातच मादीने मान वेळावून त्याला अभिवादन करण्याचा, त्याने त्याची परतफेड करण्याचा विधी पार पडला. तो नर आपल्या घरट्याचे रक्षण करीत उभा राहिला. बराच वेळ झाला दुसरा नर काही आलाच नाही. एकटी मादीच घरट्यात बसून होती. आणखी काही वेळ गेला, आणि मग तो नर उगवला. मी माझ्या घड्याळात पाहिलं, जवळजवळ साडे-चार तास ही मादी एकटीच होती.

"हा नर घरट्याजवळ आला. मादी त्याच्याकडे पहात होती. पण तिने नेहमीप्रमाणे नराला अभिवादन दिलं नाही. आणि त्याच-वेळी माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली. हा नवीन नरही सरळ तिच्यावर चाल करून गेला. मला एकदम असं वाटलं की तिथं जाऊन त्याला हाकलून द्यावा! अनपेक्षित हल्ला होतोय असं पाहून मादीही उठून उभी राहिली आणि घरट्याबाहेर जाण्याचा पवि-त्रा तिने घेतला. त्यानंतर ती आश्चर्यजनक गोष्ट घडली. शेजा-रच्या घरट्याचं रक्षण करणारा नर या उपटसुंभ नरावर त्वेषाने धावून गेला. त्याची झडप एवढी होती की तो दुसरा नर पार मागे कोलमडला. घरट्याजवळ जाण्याचं पुन्हा धैर्य त्याला झालं नाही. हा नर आता दोन्ही घरट्यांच्या मध्यभागी उभा ठाकला. जणू दोन्ही घरट्यांचं रक्षण करण्याचा आपला इरादा त्यानं जाहीर करून टाकला. मादी पुन्हा घरट्यात बसून अंडी उबवू लागली," योसाने घडलेला प्रसंग समरसून माझ्यापुढे उभा केला. "पक्ष्यांमध्येही परोपकारी वृत्ती दिसून येते. इतक्या प्रत्यक्षाने हे मला प्रथमच जाणवलं," तो पुढे म्हणाला.

"मला मात्र निराळं चित्र पहायला मिळालं," असं म्हणून त्या महाकाय गरुड पक्ष्यांनी लहानग्या गरुड पक्ष्यांच्या वसाहतीत शिरून जो गोंधळ घातला, तो मी योसाला सांगितला.

"जे चित्र आपल्या समाजात दिसतं, तेच पक्ष्यांमध्ये. आपण सर्व एकाच निसर्गाची पिल्लं," योसाने मल्लिनाथी केली.

अंधार पडू लागला तरी अनरसा आणि अनातोली परतले नव्हते. आम्ही जेवण उरकले आणि त्यांचे जेवण त्यांच्या तंबूत नेऊन ठेवले. अजून झोप येत नव्हती. थंडी असूनही तंबूत शिरण्याची इच्छा होत नव्हती. गप्पा मारण्यासाठी म्हणून आम्ही आपापल्या तंबूच्या

दारात बसलो. आकाश दाटलेलं होतं. चंद्र नव्हता. ताऱ्यांचा धूसर प्रकाश रेंगाळून झिरपत होता. दूरवर तळ्याचं अस्तित्व जाणवत होतं. मधूनच त्यावर अंधुक प्रकाशाचा झरोका पडे आणि तळ्याला जिवंतपणा प्रतीत होई. पण हा जिवंतपणा निःशब्द होता. जणू हा अंधार पुरण्यात, क्षितिज व्यापून राहिलेल्या पर्वतात आवाज विरून गेला होता. आतल्या दोघांच्या ओघातले शब्दही जणू अंतर्धान पावले होते. या प्रचंड पसाऱ्यात आपल्या नगण्यपणाची जाणीव होऊन मला क्षणभर खूप भीती वाटली. पण माणसाला विवेक अशावेळी उफाळून वर येतो आणि भावनेवर मात करतो. मन दुसऱ्या क्षणी सावरले, शांत झाले. वाटलं, निसर्गाने माणसाला ही विवेकाची शक्ती, हे वरदान मुद्दामच दिले असावे. निसर्गातली विषमता, बळी तो कान पिळी या नियमाचे अधिराज्य, यांच्यावर मात करण्यासाठी. पण निसर्गाचं पिल्लू असणारा माणूस या विवेकाचा किती वेळा उपयोग करतो? गेल्या दहा हजार वर्षांत फारसा केलेला दिसत नाही.

इथं माझं विचारचक्र थांबलं आणि मी योसाकडे पाहिलं. तोही शून्यात नजर लावून बसलेला दिसला! एवढ्यात पावसाचे थेंब अंगावर येऊ लागले. अंधुक प्रकाशावर काळा पडदा पडला. बहुधा ही वादळाची पूर्वसूचना असावी. आम्ही मुकाट्याने तंबूच्या झडपा उघडल्या, एकमेकांना "गुड नाईट" म्हटलं आणि आपापल्या तंबूत शिरलो.

रात्रभर वारा आणि पाऊस यांचा गर्जना चालू होता. मध्येच मला जाग आली, तेव्हा अमरता आणि अनातोली यांच्या तंबूत मेणबत्तीचा उजेड दिसला. रात्री उशिरा, केव्हा तरी ते परत आले असावेत. मला पुन्हा झोप लागली. पण मध्येच वाऱ्याच्या जबरदस्त फटकाऱ्याने तंबू असा गदगदे की जाग येई, तंबूला आधार देण्याचा मी केविलवाणा प्रयत्न करी. मग वारा पडला की पुन्हा झोप लागे. सगळ्यांचा तंबू टणक होता, वाऱ्या-वादळाला तोंड देण्यास समर्थ होता, ही गोष्ट मी त्या रात्री पुन्हा अनुभवली.

सकाळ फटफटली तरी वारा, पाऊस चालूच होता. मग सूर्य जसा वर येऊ लागला, त्याची ऊब आसमंतात जाणवू लागली, तसे ढग पांगू लागले, आणि आम्हाला तंबूच्या बाहेर यायला मिळालं.

कशी काढली असेल पक्ष्यांनी ही रात्र! मनात विचार आला. या वाऱ्यात, पावसात माद्या पंख पसरून अंडी उबवीत असणार. कदाचित् आपल्या छातीवरची मऊ, उबदार पिसं उपटून त्यांनी अंड्यांच्या खाली आणखी एक अस्तर तयार केलं असणार. राजहंसांच्या माद्यांना निदान अशा वादळात नराची तरी सोबत होती. पण बदकांच्या माद्या! त्या एकलकोंड्या होत्या. एकाकी झुंज देत अंडी वाचवू पहात होत्या.

एकीकडे पक्ष्यांनी रात्र कशी काढली असेल याची काळजी आणि आज नवीन काय दिसणार ही उत्कंठा. मी पुन्हा माझ्या जागी जाऊन बसण्यास अधीर झालो होतो. झटकन् न्याहरी आटपली, टेलिस्कोप, दुर्बीण उचलली, योसाला "मी निघालो" असा पुकारा केला आणि पावलं उचलली.

योसाने ~~सांगितलेला~~ वर्णन केलेला प्रसंग मनातून जात नव्हता. तो पहात असलेल्या घरट्यातून एक नर गायब झाला होता आणि माझ्या समोरच्या घरट्याजवळ एक जादा नर उपटला होता. तिथून निघून गेलेला नरच इकडे आला असेल? का हा दुसराच कोणी असेल? या नवीन थव्यातला? कळायला काहीच मार्ग नव्हता. आज या गुंतागुंतीची उकल होईल का? कोण जाणे! पण उत्कंठा वाढत होती.

मी निरीक्षणासाठी निवडलेली जागा कॅम्पपासून सुमारे दोन किलोमीटर दूर होती. दलदलीतून वाट काढीत तिथे पोचायला पाऊण तास तरी लागायचा. आकाशात ढगांची अजूनही गर्दी होती. ऊन नव्हते, वारा मंद होता. त्यामुळे ओझं घेऊन चालायला त्रास होत नव्हता. मी जागेवर पोहोचलो, तेव्हा तसं सारं शांत शांत मला दिसलं. मी अतिशय काळजीपूर्वक, माझी हालचाल फार लक्षात येणार नाही, अशा बेताने आलो असल्याने पक्षी दचकले नाहीत. गल पक्ष्यांच्या झोपडपट्टीतही नेहमीची घाई गडबड दिसली नाही. एक-दोन गल हवेत चकरा मारीत होते. काही जमिनीवर बसून होते, बाकीचे भक्ष्य शोधण्यास दूर कोठेतरी गेले असावेत. टर्न पक्षी आणि बदकेही आपापल्या घरट्यांत अंडी उबवताना दिसत होते. मधेच एखादा टर्न हवेत उडी घेई. त्याचा चिरका आवाज हवेत एक रेघ ओढी आणि पुन्हा सारे शांत होई. मला पाण्याची पातळी किंचित् वाढल्यासारखी वाटली. हा कालच्या पावसाचा, वादळाचा परिणाम, का मला भास होतोय? आणि राजहंस? शामा, नयना आणि सुरेखा — तिघीही पाठीवरच्या पिसांत माना खुपसून आपापल्या घरट्यात सावध बसून होत्या. नरांचा पत्ता नव्हता. तो थवा तरी दिसतो का म्हणून मी पाहिलं, तर सरोवरावरही सामसूम होती.

आता पक्ष्यांची वाट पहात बसणं भाग होतं. मी मग माझं आसन ठाकठीक केलं, पाय सोडून बसता येईल, रमत जागा केली आणि काहीशा आळसटपणेच आजूबाजूला पाहिलं. माझ्या डाव्या हाताला सुमारे शंभर मीटर अंतरावर दाट गवत आणि पाणवनस्पतींचा एक शिपका सरोवरात घुसला होता. त्याच्या टोकाशी मला हालचाल जाणवली. मी दुर्बीण डोळ्याला लावली आणि एक फार सुंदर पक्षी नजरेत आला. त्याचे डोकं आणि मान काळी होती, पाठ भुरकट आणि पोट पांढरे होते. डोळे चमकदार लाल होते आणि डोळ्याकडून मानेकडे सोनेरी

पिसांना गेलेला झुबका फार सुंदर दिसत होता. त्याने त्याच्या चेहे-याला तेजाची झळाळी चढली होती. काळ्या मानेची दाबचिक. मी त्या पक्ष्याला ओळखलं. पक्षी पाणवनस्पती उपटून त्याला तरता ढिगारा रचण्यात मग्न होता. इतक्या उशिरा घरटं बांधतोय? का त्यानं पहिलं घरटं काळाच्या वादळात निसटून, वाहून गेलं? पक्ष्याला घरटं रचायची घाई झाली होती हे निश्चित. त्यानं अविश्रांत काम चालू होतं. गवताची लांब पाती उपटून तो ढिगाऱ्याच्या बाजूनं खुपसत होता, तंतुमय अल्गीनं त्यावर लिंपण करीत होता आणि सरोवरातल्या तरत्या वनस्पतींची पानं ढिगावर दाबीत होता. माझ्याकडे त्यानं अजिबात लक्ष नव्हतं.

एव्हाना गरुड पक्षी परत येऊ लागले होते. त्यांचे छोटे छोटे थवे येत होते, कर्कश्श ओरडत हवेत चकरा घेऊन बेटावर उतरत होते. त्यांच्या आगमनाने दर्प आणि बदकं यांची चलबिचल झाली. पण तिन्ही हंसींनी केवळ त्यांची दखल घेण्यासाठी एकदा माना उंच करून त्यांच्याकडे पाहिलं आणि पिसांत माना खुपसून त्या स्वस्थ झाल्या. बराच वेळ मग काहीच घडलं नाही. आभाळ, पर्वत, वारा सारे स्वस्थ होते. तसंच सरोवर. मी राणा प्रताप शिखराकडे पाहिलं. त्याचा काळाकभिन्न सुळका निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर दुधारी खंजिरासारखा चमकत होता. त्या बाजूनेच मग थंड वारा सुरु झाला. दलदलींना, पाणवनस्पतींना दर्प नाचाला जणू लागला आणि प्रथम हालचाल केली सुरेखानं. तिनं मान उचलून सभोवती पाहिलं. मग तिची मान आपोआपच ताठ झाली. तिच्या डोळ्यात चमक आली आणि मान तिरपी करून तिने एक डोळा आकाशाकडे रोखला. नयना आणि श्यामाही आता माना उचलून पाहू लागल्या. आकाशाच्या घुमटात दूर कुठेतरी अस्पष्ट शब्द उमटला, "ऑरन ऑरन!" मी आभाळात पाहिलं. चिमुकल्या ठिपक्यांची जाळी दिसली. हळूहळू त्यांचा आकार मोठा होत गेला. ऑरन ऑरन करीत राजहंसांचा थवा सरोवरात उतरण्याची घाई करीत होता. तिघी माद्या आता पूर्ण स्तब्ध होऊन ते दृश्य पहात होत्या.

राजहंसांनी खाली उतरताना प्रथम आपले पाय पाण्यावर टेकविले आणि नंतर शरीर. उड्डाणाच्या वेगामुळे शरीर पाण्यावर टेकताच एकेक राजहंस पाण्याच्या पृष्ठभागावरून सरसर पुढे गेला आणि वेग कमी होऊन थांबला. विमान धावपट्टीवर थांबावे, तसा. सरोवराचा केवढा तरी पृष्ठभाग त्यांच्या येण्याने डुचमळला. लवकरच थव्यातून राजहंसांचे छोटे छोटे समूह एकत्र झाले आणि पोहू लागले. एक समूह पोहत बेटाच्या दिशेने आला. ~~आणि~~ त्यातले तीन पक्षी पुढे झाले आणि त्यांनी बेटावर पाय ठेवला. त्यातले दोघे झपाझप पुढे आले. श्यामा आणि नयना यांनी माना

उतरून नंतर तिरप्या धरून त्यांचे स्वागत केले. दोघेही नर आपापल्या घरट्याजवळ उभे राहिले, त्यांनी चोची आकाशाकडे वळ-विल्या आणि साद घातली, "ऑरन ऑरन"

तिसरा नर मात्र घोटाळत घुटमळला. तो सुरेखाच्या दिशेने सरळ वर चढून आला नाही. सुरेखाही त्याच्या हालचाली लक्षपूर्वक पाहतीय असं मला वाटलं. ~~बाकीच्या~~ बाकीच्या नरांचं त्याच्याकडे मुळीच लक्ष नव्हतं. तो थोडा पुढे सरकला, पुन्हा घुटमळ-ला, सुरेखाच्या नजरेला नजर देणं त्यानं टाळलं. सुरेखा घरट्यातल्या उठण्याच्या पवित्र्यात आली. मग तो आणखी पुढे सरकला. पण तरीही त्याची मान तिरपी होती. सुरेखा मात्र टक लावून त्याच्या-कडे पहात होती. आपण त्या गावचेच नाही असा बहाणा करीत तो टकुटकु घरट्याजवळ येऊन उभा राहिला. तक्षणी सुरेखा उठून उभी राहिली. दोघांनीही माना जमिनीसरशा केल्या, पण एकमेकां-कडे पूर्ण पाठ केली. एकमेकांवर हल्ला करण्याचा इरादा नसला की हंस असं करतात. मग तो नर झपाझप उतरत घरट्यापासून दूर जाऊ लागला आणि आश्चर्य म्हणजे सुरेखानंही त्याचं अनुकरण केलं. अंग झटकून तिनं घरट्यातून एक पाऊल पुढे टाकलं आणि तीही त्याच्या पाठोपाठ खाली उतरली. लवकरच ते दोघेही सरोवरात उतरले. एका समूहात जाऊन मिसळले आणि बेटापासून दूर गेले. श्यामा आणि नयना मात्र अजून घरट्यांतच बसून होत्या.

मला कोडं पडलं. काल सुरेखाच्या घरट्याजवळ दोन नर होते. आज एकच कसा? दुसरा कुठे गेला? हा नर घोटत का घुटमळला. सरळ घरट्याकडे का आला नाही? सुरेखा घरटं सोडून कुठे गेली? भूक लागली म्हणून न्याहरी करायला? किती वेळानं परत येईल ती? मन प्रश्न विचारीत होते. प्रश्नांना लगेच उत्तरे मिळणार नव्हती. निकराने थांबून पुढे काय होतं, ते पहाणं भाग होतं.

अर्धा पाऊण तास विशेष काहीच घडलं नाही. दुपार झाली. सूर्य आकाशात वर चढल्याचं जाणवू लागलं. वाऱ्याचा जोर किंचित वाढला. दाबलिकली घरांजवळी थांबून होती. राज-हंसांचा थवा भक्ष्य शोधीत दूर गेला होता. त्यात सुरेखाला नेम-की ओळखून काढणं शक्य होत नव्हतं. नंतर श्यामा आणि नयनाही उठून उभ्या राहिल्या. अंग झटकून घरट्याबाहेर पडल्या. सावकाश उतरत सरोवराच्या काठाशी गेल्या आणि पाण्यात उतरल्या. नरपक्षी त्यांना पोचवायला पाण्याच्या रेषेपर्यंत गेले आणि परत फिरले. ते दोघेही नंतर घरट्याजवळ येऊन उभे राहिले — पहारा देत. दोन्ही माद्या सरोवरात पोहत, मधेच माना पाण्याखाली घालीत भक्ष्य शोधीत राहिल्या. जणू त्यांनी "लंच टाईम" झाली होती.

माझी नजर सुरेखाला शोधीत होती. अजून ती घरट्याकडे परतली नव्हती. घरट्यातली अंडी आता थंड पडू लागतील, मला भय वाटत होतं. मी सरोवरात दूरदूर विखुरलेले राजहंसांचे समूह न्याहाळीत होतो. पण सुरेखाचा फिकट रंग, तिच्या पिसांवरील तपकिरी झाक दूरवरून लक्षात येत नव्हती. घरट्याकडे परत फिरण्याचा आविर्भावही कुठल्याच समूहात दिसून येत नव्हता. जवळजवळ तासभर मी राजहंसांच्या थव्यांचं बारकाईने निरीक्षण करीत होतो. एव्हाना शामा आणि नयना यांनी "लंच" आटपलं असावं. कारण दोघीही लवकर-च बेटाजवळ आल्या, बेटावर चढून त्यांनी पिसं झटकली, पाठीवरून पंखांवरून चोच फिरवून ती टापटीप केली आणि त्या घरट्याजवळ आल्या. पुन्हा एकदा नर आणि मादी यांचा अभिवादनाचा विधी पार पडला, नरांनी आदबीने त्यांना घरट्याची वाट दाखविली आणि दोघी घरट्यात स्थानापन्न झाल्या. नर पहारा देत उभे राहिले.

अजूनही सुरेखाचा पत्ता नव्हता. मी एकदा राजहंसांच्या थव्याकडे आणि एकदा शामा-नयना या दुकलीकडे नजर ठेवून होतो. अर्धा तास उलटला तरी सुरेखाचा पत्ता नाही. मग एक विलक्षण गोष्ट घडली. शामाच्या घरट्याजवळ उभा असलेला नर एकदम तावातावा-ने सुरेखाच्या घरट्याजवळ गेला आणि त्याने तिची अंडी लाथा-डली! चार अंड्यांपैकी दोन अंडी घरंगळू लागली. पायाने आणि चोचीने ढकलीत त्याने त्या अंड्यांना घरट्यापासून वेगळं केलं आणि शेवटची लाथ मारून दूर ढकलले. मग तो शांतपणे वळला, आपल्या घरट्याजवळ जाऊन उभा राहिला, चोच आकाशाकडे करून त्याने घोषणा दिली, "ऑरव ऑरव!"

मला पुन्हा लडाखची आठवण झाली. राजहंसांच्या तिथल्या वसाहतीतही घरट्याबाहेर घरंगळत जाऊन पडलेली अंडी मी पाहिली होती. असाच प्रसंग तिथेही घडला असेल का? नेकीनं संसार करणं हेच जणू निसर्गानं राजहंसांना दिलेलं वरदान आहे, असं मी आधी म्हटलं खरं, पण त्यांच्या आयुष्यातही ताण-तणाव होते, कलह होते, दुसऱ्याच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचे प्रकार होते. निसर्ग अशी विषमता मुद्दाम निर्माण करीत असावा, माझ्या मनात विचार आला. त्याशिवाय प्राण्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्याचा त्याचा कार्यभाग यशस्वी होणार नाही. ही विषमता कमी करून स्वतःच्या शहाणपणाने, समंजसपणाने लोकसंख्येचं नियंत्रण करणं फक्त मानवालाच शक्य आहे. पण हा समंजसपणा दाखव-वायचं मानवी बुद्धीला तरी अजून कुठं साध्य होतंय. विषमता, कलह, युद्धे यांनीच मानवाची लोकसंख्या कमी होतीय. या "नैसर्गिक" साध-नांवर मानवाची बुद्धी, शहाणपणा, कधी मात करू शकतील का? माझ्या डोक्यात विचारचक्र चालू झालं. चला, सोमला सांगण्यासारखं आज

काहीतरी घडलं म्हणायचं, मी मनात म्हटलं. पण योसचा विचार आला आणि मला एकदम चमकल्यासारखं झालं. डोळ्यांसमोर ग्रेटा उभी राहिली.

योस आणि ग्रेटा! छान जोडी होती. सुखाचा संसार चालला होता. त्यांना एक छोटा मुलगाही होता. त्याला वाढवताना संसारात रमून गेलेलं जोडपं मी पहात होतो. योसला चांगली नोकरी होती. निसर्ग संरक्षण, संवर्धनाच्या आवडत्या कार्यात त्यानं स्वतःला बुड-वून घेतलं होतं. उत्तर आर्क्टिक समुद्रातल्या एका दूरच्या, अज्ञात बेटावरच्या पक्ष्यांची पाहणी करण्याच्या मोहिमेची तो आखणी करीत होता. आंतरराष्ट्रीय मोहीम होती ती. ब्रिटिश, डॅनिश आणि डच असे तीन राष्ट्रांतले शास्त्रज्ञ मोहिमेत भाग घेणार होते. इंग्लिश शास्त्रज्ञांपैकी विल्डशी योसची विशेष दोस्ती जमली. मोहीम यशस्वी करून ते परत आले. तो आंतरराष्ट्रीय प्रकल्प चालूच राहिला. त्यामुळे योसला अनेकदा इंग्लंडला जावं लागे. विल्डही पुष्कळदा नेदरलँडला येई. त्यांचा घरोबा वाढला. विल्डचे वास्तव्य अनेकदा योसकडेच असे. आणि एक दिवस योस ऑफिसमधून संध्याकाळी घरी येऊन पाहतो, तर ग्रेटाची चिठ्ठी टेबलावर. विल्डबरोबर राहण्याचा तिचा निर्णय तिने चिठ्ठीत लिहिलेला. स्वतःच्या मुलावरील हक्कही तिने सोडलेला! त्या संध्याकाळी योसच्या मनाची स्थिती काय झाली असेल, याची कल्पनाही मी करू शकलो नाही. औपचारिक सांत्वनाचे चार शब्दही लिहिणं मला जमलं नाही. त्याची जरूरीही नव्हती. माझे मन तो पूर्ण जाणत होता.

योसने हा धक्का संयमानं, समंजसपणे सोसला, असं माझ्या लवकरच लक्षात आलं. निसर्ग संरक्षणाच्या कामात त्यानं स्वतःला पूर्ण बुडवून घेतलं. त्यासाठी देशोदेशी जाऊन त्यानं निरनिराळ्या संघटना, संस्था उभ्या करण्यास मदत केली. त्यातून त्याला असंख्य मित्र-मैत्रिणी मिळाल्या. योस हा त्यांना परवलीचा शब्द झाला. कितीजणांना त्याने मदत केली असेल, याची गणतीच नाही. अने-कांच्या मागे आधारवडासारखा तो उभा राहिला. अनेक राष्ट्रांत त्याला खुला प्रवेश होता. लहानग्या यॉर्डनलाही तो विसरला नव्हता. यॉर्डनचाही तो एक जिवलग मित्र बनून गेला. बाप आणि मुलगा यां-च्यात जी एक दरी नेहमी निर्माण होते, ती त्यांच्यात मुळीच तयार झाली नाही.

योसच्या विवेकाने, समंजसपणाने निसर्गनियमांवर मात केली होती!

मी अजून जाग्यावरून उठलो नव्हतो. अजूनही त्या घरट्यांकडे डोळे लावून पहात होतो. त्या बेटावर आता फारसं काहीच घडत

नव्हतं. जे घडायचं होतं, ते सर्व घडून गेलं होतं. सुरेखा आता परत येणार नव्हती. तरुण सुरेखानं नव्या जीवनास सुरुवात केली होती. काय झालं असेल तिच्या आधीच्या सहचराचं? कदाचित तोही संकटात सापडलेल्या इतर माद्यांच्या रक्षणार्थ उभा असेल — आधारवडासारखा!

सूर्य पश्चिमेकडे कलू लागला आणि मी कॅम्पकडे परत जाण्याचा निर्णय घेतला. परतीच्या वाटेवरच मला योगेश भेटला.

"काय, कशी काय झाली तुझी आजची तपश्चर्या?" त्याने मला विचारलं.

"कंटाळवाणी! फारसं काहीच घडलं नाही!!" मी उत्तर दिलं.

गेले दोन दिवस अक्सा आणि अनातोली यांची आणि माझी भेटच झाली नव्हती. सरोवराकाठच्या दलदलीत घरटी बांधणाऱ्या पक्ष्यांचं निरीक्षण करण्यासाठी ते आमच्यापासून खूप दूर जात होते. त्यांना परत यायला रात्र होत होती. सरळ त्यांच्या तंबूत जाऊन त्यांच्याशी गप्पा मारायची मला आज्ञा नव्हतं. मला कुठे त्यांच्या भाषा येत होता. योसा दुभाषा म्हणून हजर असल्याशिवाय मी त्यांच्याशी बोलू शकत नव्हतो. कॅम्पकडे परतताना म्हणूनच मी योसाला विचारलं, "अक्सा आणि अनातोलींची काय बातमी आहे? दोन दिवसांत त्यांचं दर्शनही झालेलं नाही!"

"अरे, काही विचारू नकोस," योसा म्हणाला. "परवा रात्री त्यांना यायला एवढा उशीर का झाला माहीत आहे?"

मी नकारार्थी मान हलविली.

"सरोवराकाठच्या घरट्यांची मोजदाद करायचं त्यांनी ठरविलं. घरटी शोधत आणि मोजीत ते लांब गेले. वाटेत त्यांना घोड्यांचे काही कळप चरताना दिसले. हे त्यांच्याजवळून जात असताना एकदम दहा-बारा घोडेस्वार तिथे दौडत आले आणि यांना त्यांनी घेरलं. त्यांच्यापैकी काही किरगीज होते आणि काही परदेशी होते. त्यांनी चौकशा केल्या, कशासाठी इथे आलात असं त्यांना विचारलं. त्यांच्या हातातल्या दुर्बिणी आणि टेलेस्कोप पाहून ते बरेच साशंक झाल्यासारखे वाटले. पण अक्सा आणि अनातोली यांनी त्यांना समजावून सांगितलं की ते पक्ष्यांचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ आहेत. सरकारी अंमलदार नाहीत. मग घोडेस्वारांनी मोठ्या आग्रहाने त्यांना कुमिस पिण्यासाठी त्यांच्या तळावर बोलाविलं. ते नको नको म्हणत असतानाही ते बळेच त्यांना आपल्या कॅम्पवर घेऊन गेले. अक्सा आणि अनातोली दमले होते, त्यांना भूकही लागली होती. तेव्हा हा पाहुणचार स्वीकारायचा असं त्यांनीही ठरविलं. कॅम्पवर गेल्यावर अगोदर कुमिसचे पेल्यावर पेले रिते झाले, दोघांना तिथं चांगला पुख्खाही झोडता आला. पण जेव्हा त्यांनी परत जायची गोष्ट काढली, तेव्हा ते या दोघांना परत जाऊ देईनात!"

"म्हणजे? काय पाहिजे होतं त्यांना?" मी विचारलं.

"विशेषतः अनातोलीला सोडायला ते मुळीच तयार होईनात. अनातोली आहे युक्रेनिअन. म्हणजे रशियाला जवळचा. त्यांना तो रशियनच वाटला."

"पण अनातोलीला कैद करण्यात उद्देश काय होता त्यांचा?"

"अरे, हे सगळे लोक जुन्या सोविएट रशियातून फुटून निघालेले आहेत. त्यांच्यात आपसांतील मारामाऱ्या आहेतच. सध्या एक ग्रुप बिश्केकमध्ये सत्तेवर आहे. त्यांनाही विरोधक आहेत. त्यांच्या-

पैकी काही कट्टर टोळीवाले या अशा दुर्गम भागात राहतात. त्यांना वाटलं, हा रशियन बरा आपल्या तावडीत सापडला. त्याला ओलीस ठेवला, तर रशिया स्वतःच्या मिशेलकमध्ये स्तोवर असलेल्या गुंडाला जामीन मिळवील. रशिया आणि सध्याचं सरकार यांच्यात नवे प्रश्न उपस्थित करून सरकारी सत्तेला त्रास देणं, हे इथल्या जहाल विरोधकांचं उद्दिष्ट आहे।

"बापरे! इथे असल्या राजकीय गोष्टी निर्माण होतील असं मला स्वप्नात देखील वाटलं नव्हतं," मी म्हटलं.

"तरी किरगिजिस्तानात खूपच शांतता आणि सुव्यवस्था आहे. शेजारच्या ताजिकिस्तानात पहा, सरळसरळ यादवी युद्धच चालू आहे," योसेनं सांगितलं.

"मग शेवटी सुटका कशी झाली या दोघांची?"

"ती गंमतच आहे; अनातोलीनं त्यांना खूप सांगण्याचा प्रयत्न केला की आपण रशियन नाही. शास्त्रज्ञ असल्याने आपला राजकारणाशी, कुठल्याही पक्षाशी संबंध येत नाही, वगैरे. अक्सा किरगीज असल्याने अक्सावर त्यांना विशेष विश्वास दिसला. अक्सानेही निःसंदिग्धपणे अनातोलीची बाजू घेतल्याने त्या टोळीवाल्यांतच दोन तट पडले. त्यांची वादावादी सुरू झाली. अनातोलीला ओलीस ठेवून आपल्याला कोणताही फायदा नाही, हे काही लोकांच्या लक्षात आलं होतं. ते अनातोलीला परत जाऊ देण्यास तयार होते. काही तयार नव्हते. बऱ्याच वादावादीनंतर एक तडजोड निघाली."

"कसली तडजोड?"

"अनातोलीच्या विरुद्ध असणाऱ्यांनी फर्मावलं की तुम्ही तुमचा कॅम्प आमच्यापासून जवळच्या भागात हलविला पाहिजे. म्हणजे आमची तुमच्यावर सतत नजर राहील."

"मग हलविणार आहोत आपण कॅम्प?"

"अर्थात त्या अटीवर तर अनातोलीची सुटका झाली. पण फारसं बिघडणार नाही आपलं. आज ना उद्या आपण तळ्याच्या पश्चिम भागात जाणारच होतो. तिकडे यापूर्वी अक्सा-अनातोलीनं काही कृत्रिम बेटं सरोवरात उभी करण्याचा प्रयोग केलेला आहे, तो आपल्याला पहायचाय," योसेनं सांगितलं.

आम्ही कॅम्पवर परत आलो. अक्सा आणि अनातोली आमच्या आधीच येऊन दाखल झाले होते. स्टोव्ह पेटलेले होते, गरम अन्नाचा सुगंध दरवळत होता. मला कडकडून भूक लागली होती. आम्हाला पाहताच अक्सा-अनातोली तंबूच्या बाहेर आले. दोघांच्याही चेहऱ्यावर हास्य होतं. मी पुढे होऊन अनातोलीशी हस्तांदोलन केलं आणि एका संकटातून सुटका झाल्याबद्दल त्याचं अभिनंदन केलं.

या कॅम्प साइटवरची ही आमची शेवटचीच रात्र ठरणार होती. तेव्हा शॅम्पेनची पार्टी करायची असं योसानं ठरवून टाकलेलं होतं. परत येताना अवस्सा आणि अनातोली यांनी धोरणीपणाने सरोवरातून ताजे मासे पकडून आणले होते. आम्ही आलो कॅम्पवर तेव्हा तेच भाजणं चाललं होतं. योसाने मग खास प्रसंगासाठी राखून ठेवलेली शॅंपेनची बाटली काढली. मावळतीच्या सरत्या प्रकाशात, निरभ्र आकाशाखाली, तंबूच्या बाहेरच आमची पार्टी रंगली.

मला अनातोलीला खूप प्रश्न विचारायचे होते. ते टोळीवाले कुठून आले? ते किरगीझी नसतील तर कोणत्या प्रदेशातले? त्यांचा वेष कसा होता? त्यांचा कॅम्प कसा होता? वगैरे. मी विचारीत होतो, योसा दुभाष्याचं काम करीत होता, आणि अनातोली उत्तरं देत होता. तो म्हणाला, त्यांचा तळ होता, डोंगराच्या पायथ्याशी, एका दरीआड. त्यामुळे तो सहज दिसण्यासारखा नव्हता. त्यांनी जेव्हा त्याला धरून त्यांच्या तंबूत नेलं, तेव्हा त्याला खूप भीती वाटली. कारण त्या गोल तंबूत चहूबाजूला तलवारी, खंजीर, बंदुका अशी शस्त्रं लटकत होती. इथे या लोकांनी आपली चटणी उडविली तर बाहेरच्या जगाला पत्ताही लागणार नाही असं या दोघांना वाटलं. पण कुमिसचे एक-दोन पेले पोटात गेल्यावर हवा थोडी बदलली. ते गप्पा मारण्याच्या मूडमध्ये आले. पुढे अनातोलीने खिशातून सिगारेटचं पाकिट काढून त्यांना "ऑफर" केल्यावर तर ते भलतेच खुशीत आले. इथे या दुर्गम भागात ही अत्यंत दुर्मिळ वस्तू होती. त्याचवेळी आपल्या बाजूने वातावरण हळुहळू खुलू लागलंय याची त्याला कल्पना आली. बोलण्याच्या ओघात त्याने हे सुद्धा सांगून टाकलं की कॅम्पवर आपल्याकडे सिगारेटचा भरपूर साठा आहे! शेवटी यामुळेच आपली सुटका झाली, असं अनातोलीचं म्हणणं होतं.

"उद्या आपण कॅम्प उभारला की ते पाहणी करण्यासाठी येणार आहेत," अनातोली म्हणाला. "अर्थात ते कशासाठी येणार आहेत, ते उघड आहे," तो पुढे म्हणाला.

"बरं, तुम्ही घरटी मोजायचं ठरविलं होतंत, किती झाला तुमचा आकडा?" योसानं मुद्द्याची गोष्ट काढली.

"फार नाही! बदकांची तेवीस, वेडर पक्ष्यांची चौदा आणि गूज पक्ष्यांचं एक एकच घरटी आम्हाला सापडली. त्यांच्या संख्येत चढउतार दरवर्षी होतात," अनातोली म्हणाला.

"यंदा घरट्यांची संख्या गतवर्षीपेक्षा थोडी कमी आहे, पण ही गोष्ट काळजी करण्यासारखी नाही. काळजी करण्यासारखी गोष्ट दुसरीच आहे," अवस्सा म्हणाला.

मी आणि योसाने प्रश्नार्थक मुद्रा केल्या.

"बहुतेक घरट्यांतली अंडी आम्ही तपासली. प्रत्येक घरट्यांत निम्मी तरी अंडी विकलित होती. त्यांचं कवच नीट तयार झालेलं नव्हतं," अक्सानं सांगितलं.

"असं कशानं झालं असावं?" मी आणि बोसले एकदमच विचारलं.

"इथून उत्तरेकडे कझाकस्तानच्या वाळवंटात रशियाची अण्वस्त्र चाचण्या घेण्याची केंद्रं होती. आणि दक्षिणेकडे चीनची तसलीच केंद्रं आहेत. तेथून होणाऱ्या किरणोत्सर्गाचा परिणाम असेल कदाचित," अनातोलीने मत व्यक्त केले.

युरोप-अमेरिकेत शेतांत फवारल्या जाणाऱ्या कीटकनाशकांचा असाच परिणाम होत असल्याचे मी वाचले होते. भारतातही कीटकनाशकांचे दुष्परिणाम पक्ष्यांना भोगावे लागत असल्याचे मी पाहिले होते. मी कीटकनाशकांबद्दल विचारताच अक्सा म्हणाला की इकडे कीटकनाशके कापसावर मुख्यतः वापरली जातात. किरगिजीस्तानात कापूस होत नाही. त्यामुळे कीटकनाशके फारशी कोणी वापरीत नाही.

सुदैवाने राजहंसांच्या अंड्यांवर हा परिणाम झाल्याचं दिसलं नव्हतं.

आमच्या गप्पा आणखीही रंगल्या असत्या. पण आकाश निरभ्र असल्यानं थंडीचा कडाका जाणवू लागला. मध्ये पेटलेला स्टोव्ह आणि पोटात गेलेली शॅंपेन यांची ऊब पुरेशी नव्हती. तेव्हा प्रत्येकजण आपापल्या तंबूत जाण्यासाठी उठला. आत शिरण्यापूर्वी मी अनातोलीकडून एक ब्लॅंकेट मागून घेतले.

स्लीपिंग बॅगेवर पडलो खरा, पण झोप येईना. अनातोली आणि अक्सा यांची सुटका झाली नसती तर? आमच्या मोहिमेचं काय झालं असतं मग? हाच विचार सतत मनात येत होता. खरं तर आता ती शक्यता फारशी उरली नव्हती. उद्यांची कॅम्पसाइट कशी असेल, ही उत्कंठा होतीच. बऱ्याच वेळानं झोप लागली. पण दचकून जागही आली. पोलीस आपल्याला कैद करून नेताहेत, असं स्वप्न पडलं होतं! उठायला लागलं म्हणून मी ब्लॅंकेट दूर केलं, तंबूची झिप उघडली आणि बाहेर पाहिलं. आकाश पुन्हा ढगांनी भरलं होतं. प्रकाश अंधुक झाला होता आणि शुभ्र हिम आकाशातून सावकाश खाली येत तंबूच्या कडांवर साचत होतं.

लेखांक ६ आनंदी स्मृती आणि राजहंस प्रकाश गोखले

मेरु पर्वतापल्याड 

सकाळी लवकर उठून आम्ही कॅम्प आवरला, गाड्यांत सामान भरले आणि पश्चिमेकडे निघालो. कच्च्या रस्त्यानं सुमारे पंचवीस किलोमीटर आम्ही पुढे गेलो असू. सरोवराची पश्चिम कड आता दृष्टिपथात आली. या ठिकाणी डोंगर सरोवराला भिडले होते. त्यांच्या उतारावरील पाषाणांना सरोवराच्या लाटा धडका मारीत होत्या. सरळसोट दरडी पाण्यातून अंग काढून उभ्या होत्या, तर काही ठिकाणी कपारीतील भगदाडातून पाणी आत घुसले होते. सरोवराचे पश्चिम आणि उत्तर किनारे पर्वतांनी व्यापले होते, तर दक्षिण किनाऱ्यावर सपाट कुरणे होती. या कुरणातच आम्ही तंबू उभारले.

तंबूत सामान टाकून मी बाहेर आलो आणि सभोवार नजर फिरविली. तर अक्सा आणि अनातोली यांच्या तंबूबाहेर खरोखरच एक घोडेस्वार उभा! त्याने पायघोळ लोकरीच्या कपड्याने आपले अंग झाकले होते आणि त्याच्या डोक्यावर जाड लोकरीचा जिरेटोप होता. कंबरेला तलवार लटकत होती. त्याच्या घोड्यामागे त्याचे दोन शिकारी कुत्रे होते. अक्सा तंबूबाहेर आला आणि त्याने घोडेस्वाराशी हस्तांदोलन केले. त्यांचे काही वेळ संभाषण झाले आणि पुन्हा हस्तांदोलन करून तो घोडेस्वार चालता झाला. मी प्रश्नार्थक मुद्रेने अक्साकडे पाहिले. पण त्याने नुसतेच ओठ मिटकावले.

कॅम्प उभा केल्याबरोबर लगेच सरोवरावर फेरफटका मारायचा, पक्षी पहायचे, त्यांची मोजदाद करायची आणि अक्सा-अनातोली यांनी तयार केलेल्या बेटांची स्थिती बघून यायची, असं आम्ही ठरवून टाकलेलं होतं. ते टोळीवाले आमच्या कॅम्पची "पाहणी" करायला येण्याच्या आत या सर्व गोष्टी आम्हाला उरकायच्या होत्या. नंतर काय घडेल हे कोणालाच सांगता येत नव्हतं. जे काय घडणार असेल त्याला तोंड द्यायची मानसिक तयारी प्रत्येकजण करीत होता.

तो घोडेस्वार जाताच अक्सा आणि अनातोली यांनी रबरी तराफे बाहेर काढले आणि त्यांत हवा भरली. नंतर दोघादोघांनी एकेक तराफा उचलून सरोवरापर्यंत नेला आणि पाण्यात सोडला. सरोवरात उतरल्याबरोबर आमच्या लक्षात आलं की या बाजूला चक्रवाकांची संख्या जास्त आहे. त्यांचे सोनेरी-नारिंगी रंगाचे थवे सरोवरात पोहत होते, जोड्या इकडून तिकडे उडत जात होत्या. दूरवर, तळ्याच्या उत्तर काठाशी स्वान या युरोपीय हंसांचे थवेही आम्हाला दिसले. पूर्वेकडे बाजूला एक रुंद पट्टा सरोवरात आतवर घुसला होता आणि तिथेच पक्ष्यांची हालचाल आम्हाला विशेष जाणवली.

हा वाळुकामय पट्टा आधी पहायचा असं ठरवून आम्ही
तराफे प्रथम तिकडेच वळविले. पण या पट्ट्यावर आम्हाला फक्त
आठ-दहा घरटीच आढळून आली. त्यांपैकी चार-पाच बदकांची
होती, आणि बाकीची टर्न पक्ष्यांची होती. प्रचंड आरडाओरडा
करीत गलपक्ष्यांचे थवे आकाशात घिरट्या मारीत होते, पण त्यांची
घरटी सापडली नाहीत. राजहंसांचे एकही घरटे इथे नव्हते. सरोवरात
इतके जलबाळ होते, पण त्यांचं एकही घरटं सापडलं नाही. का
असावं असं? मग लक्षात आलं की आज पाहिले तेवढे शिकारी
पक्षी आतापर्यंत या सरोवराभोवती पाहिले नव्हते. दर शंभर फुटांवर
जमिनीवर बसलेला ससाणा आमच्या येण्याने उडून दूर जात होता.
रेव्हन हे महाकाय कावळेही बरेचदा उडताना दिसले. लांबलचक पंखां-
बद्दल प्रसिद्ध असलेलं लॅमरगीयर गिधाडही आम्ही इथे पाहिलं.
या शिकारी पक्ष्यांमुळे इथे घरटी बांधणं धोक्याचं वाटत असेल
का इतर पक्ष्यांना? लडाखमध्ये एका वर्षी गरुडांच्या एका जोडीने
राजहंसांच्या कित्येक घरट्यांचा विध्वंस केल्याचं मी पाहिलं होतं.

आम्ही नंतर अक्सा-अनातोली यांनी गेल्या वर्षी तयार
केलेल्या बेटांकडे वळलो. सरोवराच्या उथळ भागात वाळू आणि
मातीची भर टाकून आणि त्यावर गवत लावून त्यांनी ही छोटी
बेटं बांधली होती. त्यावर गवत व इतर पाणवनस्पती वाढल्याने ती
आता जागेवर स्थिरावली होती. आम्ही बेटावर पाय ठेवला मात्र,
दोन स्नाइप पक्षी भुर्रकन उडाले आणि जमिनीसरसे उडत दूर
गेले. बेटावर आणखीही एक घरटे आम्हाला सापडले. ते रेडशँक
पक्ष्याचे होते. आता अक्सा आणि अनातोली बेहद्द खूश झाले. त्यांनी
तयार केलेली बेटं पक्ष्यांच्या पसंतीस उतरली होती. त्यांचा प्रयोग यशस्वी
झाला होता. खरं तर राजहंसांना इथे घरट्यांसाठी जागा कमी पडते
म्हणून नवीन बेटं तयार करायची, असा त्या प्रयोगाचा उद्देश होता.
आज या बेटांवर राजहंस नव्हे, पण इतर पक्षी घरटी करू लागले
होते. येत्या काही वर्षांत राजहंसही इथे येतील, त्यासाठी बेटांचा आकार
कदाचित मोठा करावा लागेल, अशी चर्चा त्यांच्यात चालू झाली. प्रयोग
यशस्वी होण्याची, पुढे चालू ठेवण्याची शक्यता दिसून आल्याने त्यांना
प्रचंड हुरूप आला. त्यांच्या दृष्टीने ही मोहीम पूर्ण यशस्वी झाली होती!

टंच फुगलेल्या तराफ्यावर गारांचा ताशा वाजू लागला
तेव्हा आम्ही आभाळाकडे बघितले. ते गच्च भरले होते काळ्या
ढगांनी आणि बोराएवढ्या गारा सटासट कोसळत होत्या. आम्ही
कोणीही रेनकोट बरोबर आणले नव्हते. अनातोलीने आपलं जॅकेट
काढलं आणि माझ्या अंगावर भिरकावलं. ते डोक्यावर घेऊन
मी गारांपासून माझा बचाव करू लागलो. अनातोली सपासप

वल्हीं मारीत होता आणि पावसात चिंब भिजत होता. योसा आणि अक्साची तीच स्थिती झाली होती.

सरोवराच्या काठ जवळ येताच आम्ही तराफ्यातून पाण्यात उतरलो आणि तराफा काठावर ओढले. मग पावसातून पळत पळत येऊन तंबू गाठले. आता कपडे बदलून टोळीवाल्या घोडेस्वारांची वाट पहात बसणे एवढाच उद्योग उरला होता.

थोड्या वेळानं योसाची हाक कानांवर आली म्हणून मी तंबूची झडप उघडली.

“प्रकाश, मी आणि अनातोली पिण्याचं पाणी शोधायला जातो. तू आणि अक्सा कॅम्पवर थांबा. टोळीवाले आले तर अक्सा त्यांच्याशी बोलेल. त्यांना इथेच थांबवून ठेवा. तोपर्यंत आम्ही येतोच,” योसा म्हणाला.

मी मान डोलावली. अक्सा तंबूतच होता. त्याच्या तंबूतून अनातोली बाहेर पडला. योसाने लॅंडरोव्हर सुरू केली आणि ते निघून गेले.

पावसाची रिपरिप थोडावेळ चालली आणि थांबली. आकाश निवळू लागले. थोड्याच वेळात पश्चिमेकडे कलू पाहणाऱ्या सूर्यानं प्रसन्न मुख ढगाआडून डोकावले आणि त्याच्या सोनेरी हास्यानं आसमंत भरून गेला. वातावरण स्वच्छ झाल्याची जाणीव मला झाली तशीच आणखीही एकाला झाली असावी. त्याचं फुरफुरतं, नाजूक गुलाबी नाक जमिनीतून बाहेर येताना मी पाहिलं. काही वेळ त्यानं ताज्या हवेचा आस्वाद घेतला आणि टुणदिशी उडी मारून तो प्राणी बाहेर आला. या सुंदर सोनेरी रंगाच्या आणि खारीशी साम्य असलेल्या प्राण्याचं नाव मार्मोट. त्याचा रंग असा की जणू सूर्यानं स्वतःच त्याच्या पाठीवरून हात फिरविला आहे. लडाखमधेच त्याची आणि माझी ओळख झाली होती. ~~अ~~ मार्मोट अतिशय भित्रा पण आता आसपास सामसूम झाल्यानं आपल्या बिळातून बाहेर पडला. मी निश्चल राहून त्याच्याकडे ~~पाहिलं~~ पहात होतो. त्यानंही माझ्याकडे पाहिलं. माझी काहीच हालचाल नाही असं पाहून किचकिचाट केला आणि माझ्याकडे पाठ फिरवून तो गवतात न्याहरीसाठी उतरला. पश्चिमेकडून हवेवर तरंगत एक रेखीव तपकिरी रंगाचा पक्षी आला आणि एका उंचवट्यावर टेकला. थोडा वेळ इकडेतिकडे करून त्याने पुन्हा हवेत उडी घेतली, आणि जिना चढावा तसं पंख मिटून एकेका उसळीबरोबर हवेत तो उंच उंच चढू लागला. पाहता पाहता तो इतका उंच गेला की तो मला नीट दिसेना, मग हवेतून गाण्याच्या दोन सुंदर लकेरी कानांवर आल्या आणि पंखाच्या एका फडझापबरोबर तो पक्षी

शंभर शंभर फूट हेलकावून खाली येऊ लागला. सुप्रसिद्ध लार्क किंवा चंडोल पक्ष्याचं नृत्यगान मी अनुभवीत होतो.

माझ्यासमोर पसरलेली ॲस्ट्रॅगॅलसची आणि रॅननक्यु-लसची जांभळी-पिवळी फुलं नक्षत्रासारखी चमचमत होती. त्यावर कोठूनतरी एक गर्द नारिंगी रंगाचं फुलपाखरू येऊन उतरलं. दुसरीकडून तसलं दुसरं फुलपाखरू आलं आणि त्या पुष्पशय्येवरच त्यांचं मीलन झालं. ओल्या गवतात स्वच्छंदपणे उड्या मारणारे टोळ मी पहात होतो, आणि गवताच्या रुंद पात्याच्या टोकावर बसू पहाणारी एक मोठी भुंगामाशी माझी नजर खिळवून पहात होती. सगळीकडून आनंद ओसंडून चालला होता.

सृष्टीचं एवढं आनंदी रूप मी कितीतरी दिवसांनी अनुभ-वित होतो. इथं आल्यापासून हृदयांत भरून राहिलेली साशंकता आता दूर झाली. आपोआप पळून गेली आणि सृष्टीच्या त्या चैतन्यस्पर्शानं अंग थरारलं. त्या चिमुकल्या जीवांनी केवढा प्रकाश माझ्या हृदयाला पुरविला होता!

त्या आनंदात उठून मी अकरमला हाक मारली. त्या-बरोबर तोही झरकन तंबूबाहेर आला. क्षणभर तो बावचळला. मी त्याच्याकडे पाहून हसलो आणि आसमंतात पसरलेली जादू त्यालाही जाणवली. आम्ही दोघेही त्या अपार, असीम निसर्गाचा आस्वाद घेत उभे राहिलो.

टोळीवाल्यांना अजूनही पत्ता नव्हता. हवा इतकी मस्त होती की मला स्वस्थ बसवेना. आमच्या कॅम्पच्या मागे सोप्या उताराची, हिरव्या गवताने आच्छादलेली एक लुसलुशीत टेकडी होती. असल्या टेकड्या मला फार आवडतात. त्या हजारदा चढून यावात, त्या मजेशार, दुलईसारख्या गुबगुबीत उतारांवर लोळावं असं वाटतं. मी खुणेनंच अकरमला सांगितलं की मी ती टेकडी चढून येतो आणि त्या लोभावणाऱ्या उतारांकडे धावत सुटलो.

टेकडी चढताना मला दूरवर घोड्यांचे कळप दिसले. पण जवळपास कोणी घोडेस्वार तिथे दिसला नाही. दुरून घोडे-स्वार दिसताच आपण पळत परत यायचं असं मी ठरविलं होतं. रमतगमत मी टेकडी चढू लागलो. कुठे गवताला गोंजारत, कुठे एखाद्या फुलाला जवळ घेत, कधी गवतावर अंग झोकून आकाशात संथपणे सरकणारे ढग पहात मी टेकडीवर हिंडत होतो. माथ्यावर पोहोचून तिथल्या थंड हवेचा मी भरपूर आस्वाद घेतला, फुफ्फुसं भरून घेतली. अफाट पसरलेल्या निळ्याभोर सरोवराचं आणि त्यामागील चमचमत्या हिमशिखरांचं दृश्य डोळ्यांत साठवून ठेवलं आणि मगच टेकडी उतरायला सुरुवात केली.

इतक्यात पूर्वेच्या बाजूने धुळीचे लोळ आकाशात उठताना दिसले. हे नक्कीच घोडेवाले असणार. ते पोहोचण्यापूर्वी आपण कॅम्पवर पोहोचलं पाहिजे, असं मनाला बजावीत मी टेकडीच्या उतारावरून धावू लागलो. थोड्याच वेळात मी कॅम्प गाठला आणि धापा टाकीत तंबूजवळ उभा राहिलो. आमच्या कॅम्पपलिकडून जाणारा तो कच्चा रस्ता आणखी एका टेकडीच्या उताराला वळसा घालीत पूर्वेकडे गेला होता. त्या टेकडीच्या उतारामागचा रस्ता दिसत नव्हता, पण त्यावरून उठणारे धुळीचे लोट आता कॅम्पवरूनही दिसत होते. मी अवस्याला हाक मारली आणि तो तंबूबाहेर येताच पूर्वेकडे बोट केले. ते धुळीचे लोट दिसताच तोही टक लावून तिकडे पाहू लागला.

लवकरच ते धुळीचे लोट त्या टेकडीच्या उतारामागून पुढे आले, गाड्यांचा गर्जना कानांवर आला आणि घोडेस्वारांच्या ऐवजी जीपगाड्यांचा एक ताफा नजरेत आला. अवस्या आणि मी दोघांनीही एकमेकांकडे आश्चर्याने पाहिले. गाड्यांचा ताफा आमच्या कॅम्पच्या दिशेने पुढे सरकला आणि जवळ येताच कर्रदिशी ब्रेक लावून गाड्या उभ्या राहिल्या. त्याबरोबर गाडीतून एक गौरवर्णी, लालबुंद चेहऱ्याचा, हनुवटीवर छोटी दाढी राखलेला माणूस खाली उतरला. त्याचा पोशाख आणि डोक्यावरची ऐटबाज टोपी यांवरून तो सरकारी अंमलदार आहे, हे जाणवत होते. "ही काय नवीनच बला उपटली," माझ्या मनात विचार आला.

अवस्याने मात्र त्या माणसाला ओळखलं असावं. तो झटकन पुढे झाला आणि त्याने हस्तांदोलन केले. अवस्याशी हस्तांदोलन करताना या सरकारी माणसाची नजर मात्र माझ्याकडे होती.

"ॲण्ड हू आर यू?" त्यानं अस्खलित इंग्रजीत विचारलं. मला आश्चर्य वाटलं. "आय ॲम प्रकाश," असं म्हणत मीही हस्तांदो-लनासाठी हात पुढे केला.

"ओहो! फार आनंद झाला तुला भेटून, पत्राने आपली ओळख आधीच झालेली आहे," तो म्हणाला. "मी सर्गेई याको-लेव्ह."

मलाही तत्क्षणी ओळख पटली. सर्गेई किरगिजीस्तानच्या वन्य प्राणी संरक्षण विभागात अधिकारी होता. राजहंसांवरच काम करीत होता. निसर्गात राजहंसांची सगळी पिलं कधीच जगत नाहीत. पुष्कळशी लहानपणीच मृत्युमुखी पडतात. तेव्हा राजहंसांच्या घरट्या-तून काही अंडी गोळा करायची, त्यांना कृत्रिमरीत्या उबवायचे, पिलं त्यातून बाहेर पडली की त्यांना मोठी होईपर्यंत वाढवायचं आणि उन्हाळ्यात सोंगकुल सरोवरात सोडायचं, ती वन्य राजहंसांत मिस-ळून त्यांच्याबरोबर स्थलांतर करतील, वन्य जीवन जगू लागतील अशी

आशा करायची, असं त्याच्या प्रयोगाचं स्वरूप होतं. गेली दोन वर्षं काही राजहंसांनी असं प्रदेश स्थलांतर केल्यानं त्याच्या प्रयोगाला हळूहळू यश येत होतं, हे दिसत होतं.

एवढ्यात योसा आणि अनातोलीही तिथे येऊन दाखल झाले. "हाय सर्गेई" असं म्हणत योसाने त्याला मिठी मारली.

सर्गेईच्या स्वागतासाठी अक्सा आणि अनातोलीची धाव--पळ सुरू झाली. इकडे आमच्या गप्पा सुरू झाल्या. याकोलेव्हला इंग्रजी येत असल्यानं प्रथमच मला संभाषणात भाग घ्यायला मिळत होता. योसानं त्याला अक्सा आणि अनातोलीवर उद्भवलेला प्रसंग सांगितला.

"हं! आता तुम्हाला त्यांची भीती नको. आमच्या टेहळणी पथकानं त्यांना केव्हाच अभयारण्याच्या बाहेर घालवलंय," सर्गेई म्हणाला. सोंग कुलचं अभयारण्य त्यांच्याच अधिकारात येत होतं.

"आता इथला तुमचा मुक्काम हलला की सरळ माझ्याकडे इशिक कुलला यायचं. माझे हंस पहायला," सर्गेईने आमंत्रण दिलं. "त्यांचा मोठा थवा तयार करतोय मी," तो अभिमानाने म्हणाला.

कृत्रिमरीत्या वाढविलेले हंस पाहण्यात मला स्वारस्य नव्हतं. पण केव्हाना केव्हा ते वन्य राजहंसांसमवेत स्थलांतर करू लागणार ही फार महत्त्वाची गोष्ट होती. त्याचं आमंत्रण आम्ही आनंदाने स्वीकारलं. सोंग कुलवर घरटी करणाऱ्या राजहंसांच्या अडचणी आम्ही पाहिल्या होत्या. मुख्य अडचण होती, अपुऱ्या जागेची. ती चिमुकली दोन बेटं एवढी जागा साठ-सत्तर राजहंसांच्या थव्याला पुरेशी नव्हती. त्या दृष्टीने अक्सा-अनातोलींनी केलेला बेटं बांधण्याचा प्रयोग महत्त्वाचा आहे आणि तो चालू रहावा असं आम्ही सर्गेईला सुचविलं. त्यानेही त्या गोष्टीला मान्यता दिली.

"हंसांवरची पुढची आंतरराष्ट्रीय परिषद आपण बिश्केकला घेऊ या," योसाने आमिष दाखविलं आणि याकोलेव्ह खूष झाला. सरकारीरीत्या मिरवायला कोणाला नको असतं!

इशिक-कुलला येण्याचं आमंत्रणाबद्दल पुन्हा एकदा वचन देऊन सर्गेईचा ताफा परत गेला. आम्ही सर्वांतील दुसरा केले-सगळ्यांच्याच मनावरची ओझी उतरली होती. मोहीम यशस्वी झाल्याचं सुख प्रत्येकजण अनुभवीत होता. इशिक-कुल ही आता निव्वळ चैन उरली होती. आरामात जेवण आणि खूप गप्पा झाल्यावर केव्हांतरी आम्ही निद्राधीन झालो. मला स्वप्न पडलं की राजहंसांचा खूप मोठा थवा ~~दा~~ दक्षिणेकडे निघालाय आणि शिरस्त्राण घातलेला एक चिलखतधारी योद्धा उडत्या घोड्यावरून त्यांना वाट दाखवितोय. राजहंस आणि मनास यांच्या स्मृती जपत आणि मेरू पर्वताच्या परिसरात रेंगाळणारे मन आवरीत मी भारतात परतलो.